
महेंद्र पेडावाला
रजवाडी
गुजराती थाळी
दर रविवार - दालवाटी, चुरमा
* थाळीमध्ये दररोज आमरस *
(रेल्वे पार्सल सुविधा)
किटी पार्टी, बर्थ डे पार्टी
करिता ५० जणांची उत्तम व्यवस्था
(आमरस - ४००/- रु. किलो मिळेल)
कापड बाजार, कोहिनूर शेजारी, अ. नगर



RNI No. 6153/57

# समाचार
SAMACHAR

■ Volume - 72 ■ Issue- 199 ■ Marathi Daily ■ Monday 15/4/2024 ■ Pages - 6 ■ Price- Rs. 3



उपवासाची कारणे अनेक, शाबुदाणा मात्र एक..
1 किलो | 500 ग्रॅम | 250 ग्रॅम पॅकिंगमध्ये उपलब्ध
CAMEL SAGO ATUL FOOD PRODUCTS ®
कॅमल
सुपरफाईन शाबुदाणा
कॅमल इन्स्टन्ट शाबुदाणा 1KG पॅकमध्ये उपलब्ध
स्टॉकिस्ट अशोक बन्सीलाल पारख
कॅमल हाऊस, आडते बाजार, अहमदनगर. (0241) 2343896/2341196


## उठाठेव

- विवेक मेहेत्रे



आगामी निवडणुका, वाढता भ्रष्टाचार, लोकांचे नैराश्य, तरूणांचा चंगळवाद याविषयी तिला काहीच वाटत नाही... कारण विविध चॅनेल्सवरील अनेक मालिकांचे सर्व एपिसोडस् न चुकता पाहण्यामुळे तिला चिंतनासाठी वेळच उरत नाही...!

### २१ निवृत्त न्यायाधिशांनी व्यक्त केली चिंता; सरन्यायाधिशांना पत्र

# न्याय व्यवस्था कमकुवत करण्याचा प्रयत्न

**नवी दिल्ली, दि.१५-** सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालयांच्या २१ निवृत्त न्यायाधीशांनी सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांना एक पत्र लिहिले आहे. या पत्राच्या माध्यमातून न्यायव्यवस्था कमकुवत करण्याचा प्रयत्न जाणीवपूर्वक काही गटांकडून करण्यात येत असल्याचे या निवृत्त न्यायाधीशांनी म्हटले आहे. याबाबत निवृत्त न्यायाधीशांनी पत्रातून चिंता व्यक्त केली आहे. हे पत्र लिहिलेल्या २१ निवृत्त न्यायाधीशांपैकी ४ सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश आहेत. तसेच १७ उच्च न्यायालयाचे



निवृत्त न्यायाधीश आहेत.

काही घटक संकुचित राजकीय हितसंबंध आणि वैयक्तिक फायद्यांनी प्रेरित असून न्यायव्यवस्थेवरील जनतेचा विश्वास कमी करण्याचा प्रयत्न करत आहेत. न्यायालयाच्या प्रक्रियेवर दबाव टाकण्याचा प्रयत्न होत आहे. यामुळे फक्त न्यायव्यवस्थेच्या पावित्र्याचा अनादर होत नाही तर कायद्याचे रक्षक या नात्याने न्यायमूर्तींनी शपथ घेतलेल्या निष्पक्षतेच्या तत्त्वांना आव्हान दिले जाते. त्यामुळे आम्हाला काळजी वाटते की, जनतेचा विश्वास कमी होऊ नये, असे त्यांनी म्हटले आहे.

चुकीच्या माहितीच्या आधारे न्यायव्यवस्थेच्या विरोधात बोलण्याबाबत आम्ही विशेषतः चिंतीत आहोत. हे फक्त अनैतिकच नाही तर लोकशाहीच्या तत्त्वांसाठीही हानिकारक आहे. एखादा निर्णय एखाद्याच्या मतांशी सुसंगत असेल तर न्यायालयाच्या निर्णयांवर प्रशंसा करणे आणि एखाद्याच्या मताशी सुसंगत नसलेल्या निर्णयावर कठोर टीका करणे, ही पद्धत कायद्याच्या नियमांना कमी करते, असे २१ निवृत्त न्यायाधीशांनी पत्रात म्हटले आहे. तसेच न्यायव्यवस्थेवरील जनतेचा विश्वास उडण्याची भीतीदेखील या पत्रात व्यक्त करण्यात आली आहे. सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती दीपक वर्मा, कृष्णा मुरारी, दिनेश माहेश्वरी आणि एम.आर. शाह आणि उच्च न्यायालयाचे माजी न्यायूमर्ती परमोद कोहली, एस.एम. सोनी, अंबादास जोशी आणि एस.एन.धिंग्रा यांचा समावेश आहे.

# भाजपाचे संकल्पपत्र म्हणजे मोदी गॅरंटी- फडणवीस

**मुंबई, दि.१५-** २०१९ ला मोदी सरकारने जो जाहीरनामा दिला होता, त्यात जी ७५ आश्वासने दिली होती ती सर्व पूर्ण करण्यात आली आहेत.



भाजपाचे संकल्पपत्र हे कागदी नसून ती मोदींची गॅरंटी आहे. देशातील सर्व घटकांचा विकास करण्याचा संकल्प भाजपाचा आहे. देशभरातील १५ लाख लोकांच्या सूचनेतून भाजपाचे संकल्पपत्र तयार करण्यात आलं आहे. मोदी गॅरंटीवर जनतेचा विश्वास असून पुन्हा एकदा तिसऱ्यांदा महाराष्ट्रात आणि देशात येईल असा विश्वास उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे.

देवेंद्र फडणवीस म्हणाले की, काँग्रेसने राजस्थान, छत्तीसगड, हिमाचल, कर्नाटक यासारख्या राज्यात एकही गोष्ट जाहीरनाम्यातील केली नाही. काँग्रेससाठी जाहीरनामा हा कागद (पान ३ वर)

### भिंगार कॅम्प पोलिसांची कामगिरी

# ट्रक चालकास लुटणारे आरोपी १२ तासात जेरबंद

**समाचार/नगर-दि.१५**

ट्रक चालकास लुटून मारहाण करणाऱ्या सात आरोपींना भिंगार कॅम्प पोलिसांनी जेरबंद केले. सहायक पोलिस निरीक्षक योगेश राजगुरू यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक किरण साळुंके, पोलिस अंमलदार रेवणनाथ दहिफळे, कैलास सोनार, संदीप घोडके, रामनाथ डोळे, दीपक शिंदे, रवींद्र टकले, संदीप थोरात, समीर शेख, कैलास शिरसाठ, अमोल आव्हाड यांनी




ही कारवाई केली.


फिर्यादी बबलू विश्वनाथ जाधव (रा. दरेवाडी, ता. नगर) हे त्यांच्या ट्रकमध्ये (एमएच २० बीटी ३९१२) एव्हरेटस कंपनीचा माल लखमापूर फाटा नाशिक येथे भरून ते ट्रक घेऊन नगर शहरात आल्यानंतर नगर-पुणे रस्त्यावर डीएसपी चौकाच्या पुढे पाण्याच्या टाकीजवळ ट्रक आला असता, काळ्या रंगाची कार ट्रकला आडवी लावली. कारमधील दोन इसमांनी ट्रकचा दरवाजा उघडून एकाने लाथाबुक्क्यांनी मारहाण केली आणि फिर्यादीच्या खिशातून २१ हजार ५०० रूपये बळजबरीने काढून घेतले. तसेच एकाने (पान ३ वर)

# घरफोडी प्रकरणातील दोन सराइतांच्या आवळल्या मुसक्या

**समाचार/नगर-दि.१५**

घरफोडीच्या गुन्ह्यातील सराईत २ आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेने जेरबंद केले. पोलिस निरीक्षक दिनेश आहेर यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक समाधान भाटेवाल, पोलीस अंमलदार दत्तात्रय गव्हाणे, रवींद्र कर्डीले, संदीप दरंदले, ज्ञानेश्वर शिंदे, देवेंद्र शेलार, भीमराज खर्से, फुरकान शेख, अमोल कोतकर, भाऊसाहेब काळे, किशोर शिरसाठ, चंद्रकांत कुसळकर, अरुण मोरे यांच्या पथकाने ही कारवाई केली.

मोहनीराज आनंदा जाधव (रा. मुकींदापुर, ता. नेवासा) हे घर बंद करुन शेतात गेले होते. त्यांच्या घराचा दरवाजा तोडून चोरट्यांनी कपाटातील ६० हजार रूपये किंमतीचे सोन्याचे दागिने चोरुन नेले होते. याप्रकरणी नेवासा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हे शाखेच्या पथकास आरोपी आकाश छगन काळे (रा. गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर) याने त्याच्या साथीदारासह सदरचा गुन्हा केला असून (पान ३ वर)


कमी ऐकू येते का ?

signia Life sounds brilliant...
कंपनीचे अधिकृत विक्रेते
● न दिसणारे डिजीटल श्रवण यंत्र
● ३१ वर्षापासून सेवेत
● इंग्लडमधील अनुभव असलेले ऑडिओलॉजिस्ट
● लहान मुलांच्या तपासण्या ● स्पीच थेरपी
स्थापना : १९९२
साई हिअरिंग क्लिनिक
15% Discount
साई सर्जिकल अॅण्ड हिअरिंग सर्व्हिसेस
मुख्य शाखा : कोहिनूर प्लाझा (बेसमेंट), पत्रकार चौक, लोकमत भवन शेजारी, अहमदनगर.
फोन : 0241 - 2429795. मो. 83800 41240
शाखा नं. १ : शॉप नं. १५, डी.पी. रोड, शिवतारा गार्डन, गणेश सोसायटी, चैतन्यनगर, कोथरुड, पुणे. मो. 9028075405
kalika
वेळ : सकाळी १० ते सायं. ७ (रविवार बंद)

कोहिनूरच्या ८९ व्या वर्धापनदिनानिमित्त सप्रेम भेट!
खरेदी करा 100%
पैसे भरा मात्र 89%
सदा सर्वदा सर्वांसाठी सर्वोत्तम कपडे
कोहिनूर ®
CELEBRATING 89TH ANNIVERSARY
1935-2024
ऑफर १६ १७ १८ एप्रिल पर्यंत
कोहिनूर मॉल, सावेडी | कोहिनूर, एम.जी. रोड, अ. नगर 98220 94093

संपादकीय

# आयुष्य वाढतेय...

अलिकडेच जाहीर झालेला द लॅन्सेटचा आरोग्यविषयक एक अहवाल लक्षवेधी ठरणारा आहे. करोनामुळे माणसाला जगण्याची खरी किंमत कळली. करोनानंतरच्या काळात अनेक जीवघेण्या आजारांचे प्रमाण वाढले असून अनेक कोवळे जीवही गंभीर आजारांना बळी पडण्याच्या प्रमाणात मोठी वाढ झाली आहे. मात्र एकीकडे असे विदारक आणि निराशाजनक चित्र असताना अलिकडेच जाहीर झालेल्या द लॅन्सेटच्या अहवालानुसार जगभरातील लोक १९९० च्या तुलनेत २०२१ मध्ये सरासरी सहा वर्षे जास्त (६.२ वर्षे) जगत आहेत. म्हणजेच केवळ भारतातच नव्हे तर जागतिक पातळीवर लोकांचे आयुर्मान वाढत असल्याची बाब निश्‍चितच आनंदाची आहे. हे वैद्यकीय क्षेत्रातील संशोधन आणि औषधनिर्मितीला आलेले यश असल्याचेही आपण म्हणू शकतो. १९९० ते २०२१ या काळात भारतातील आयुर्मान आठ वर्षांनी वाढल्याचे हा अहवाल सांगतो. भूतानमध्ये गेल्या १३.६ वर्षात नागरिकांच्या आयुर्मानात सर्वाधिक वाढ झाली आहे. भूताननंतर बांगलादेश (१३.३), नेपाळ (१०.४), भारत (८.२) आणि पाकिस्तान (२.५) आहेत. साथीच्या रोगामुळे निर्माण झालेली आव्हाने असूनही दक्षिणपूर्व आशिया, पूर्व आशिया आणि ओशनिया या प्रदेशांनी १९९० ते २०२१ दरम्यान आयुर्मानात ८.३ वर्षांची सर्वाधिक वाढ अनुभवली आहे. १९९० ते २०२१ या कालावधीत दक्षिण आशियातील आयुर्मानात दुसरी सर्वात मोठी वाढ ७.८ वर्षे होती. अतिसारामुळे होणाऱ्या मृत्यूंमध्ये झालेली मोठी घट हे त्याचे प्रमुख कारण आहे. प्रादेशिक स्तरावर, पूर्व उप-सहारा आफ्रिकेत आयुर्मानात सर्वात मोठी वाढ दिसून आली आहे. येथे तीन दशकात आयुर्मान १०.७ वर्षांनी वाढले आहे. या क्षेत्रात सुधारणा होण्यामागे अतिसारावर नियंत्रण हे प्रमुख कारण होते. पूर्व आशियामध्ये आयुर्मानात दुसरी सर्वात मोठी सुधारणा दिसून आली. संशोधकांच्या मते, डायरिया, श्‍वसन संक्रमण, स्ट्रोक आणि इस्केमिक हृदयरोगामुळे होणाऱ्या मृत्यूंच्या संख्येत घट झाल्यामुळे जागतिक आयुर्मानात वाढ झाली आहे. आयुर्मान म्हणजे एखादी व्यक्ती किती वर्षे जगण्याची अपेक्षा करू शकते. इथे लक्षात घ्यायला हवे की, आयुर्मान एका विशिष्ट लोकसंख्येच्या गटातील सदस्यांच्या मृत्यूच्या सरासरी वयाच्या अंदाजावर आधारित असते. त्यामुळे आयुर्मान वाढणे हे आरोग्यविषयक सकारात्मकतेचे एक लक्षण समजले जाते. ग्लोबल बर्डन ऑफ डिसीज स्टडी २०२१च्या अद्ययावत अंदाजांवर आधारित अभ्यासात म्हटले आहे की, करोना साथीने लॅटिन अमेरिका, कॅरिबियन आणि उप-सहारा आफ्रिका ही सर्वाधिक प्रभावित क्षेत्रे ठरली. २०२१ मध्ये करोनामुळे त्यांची आयुर्मानाची सर्वाधिक वर्षे कमी झाली. मृत्यूचे कारण आणि जागतिक, प्रादेशिक, राष्ट्रीय आणि उपराष्ट्रीय स्तरावर गमावलेल्या आयुष्याची वर्षे या निकषांच्या आधारे मृत्यूचे मोजमाप होते. या विश्‍लेषणातून मृत्यूची विशिष्ट कारणे आयुर्मानातील बदलांशी जोडली जातात आणि त्यातून महत्त्वपूर्ण निष्कर्ष समोर येतात. त्यानुसार गेल्या तीन दशकांमध्ये भारतातील आयुर्मान आठ वर्षांनी वाढल्याची बातमी समाधानकारक आहे. येत्या काळात नवजात बालकांची संख्या कमी होईल आणि वृद्धांची संख्या वाढेल. अहवालानुसार २०५० पर्यंत वृद्धांची लोकसंख्या ३० कोटींपेक्षा जास्त होण्याची अपेक्षा आहे. असे असताना भारत ज्येष्ठ नागरिकांची सेवा करण्यास तयार आहे का? त्यांच्यासाठी हेल्थकेअर मार्केट तयार आहे का? त्यांच्यासाठी कोणतीही मोठी पेन्शन योजना नसल्याने त्यांच्या आर्थिक सुरक्षेचे काय होणार? असे सगळे प्रश्न आ वासून पुढे उभे आहेत.भारतातील सामाजिक सुरक्षेची चौकट मर्यादित असल्याने (म्हणजे सेवानिवृत्तीनंतर लोकांना मदत करणारी कोणतीही मोठी पेन्शन योजना किंवा इतर मेगा स्कीम नसणे), बहुतेक ज्येष्ठ नागरिक त्यांच्या बचतीवर मिळणाऱ्या व्याजावर अवलंबून असतात. परंतु व्याजदर बदलत राहतात. त्यामुळे काही वेळा त्यांचे उत्पन्न कमी होते. त्यामुळे ज्येष्ठ नागरिकांच्या ठेवीवरील व्याजदर निश्‍चित करण्यासाठी नियामक यंत्रणेची गरज आहे. वयोवृद्ध महिलांना अधिक सवलती दिल्यास त्यांच्या आर्थिक सुस्थितीत हातभार लागेल. वरिष्ठांना सवलतीच्या किमतीत सल्लामसलत ते निदान आणि उपचारापर्यंत वैद्यकीय सेवा प्रदान करण्यासाठी पीपीपी मॉडेलद्वारे खाजगी क्षेत्रासोबत भागीदारी विकसित करण्याचा विचारही होऊ शकतो. यामुळे हे वाढते आयुर्मान आनंददायी ठरु शकेल. अन्यथा, केवळ आयुर्मान लांबेल आणि त्याबरोबर चिंताही...

## नरहरी महाराजांच्या रजत पादुकांचा प्राणप्रतिष्ठापना सोहळा



समाचार/नगर-दि.१५

श्री संत शिरोमणी संतश्रेष्ठ श्री नरहरी महाराज यांच्या रजत पादुकांचा दि. १६ एप्रिल रोजी प्राणप्रतिष्ठापना सोहळा आयोजित करण्यात आल्याची माहिती श्री संत शिरोमणी नरहरी महाराज दिंडी सोहळ्याचे अध्यक्ष सचिन कुलथे यांनी दिली.

तालुक्यातील वारकरी पीठ (संत पंढरी,) पिंपळगाव वाघा येथील सद्गुरु श्रीकृष्ण कृपांकित श्री डॉ. विकासानंद मिसाळ महाराज यांच्या हस्ते दि. १६ एप्रिल रोजी सकाळी ९ वाजता प्राणप्रतिष्ठापना सोहळ्याचा कार्यक्रम होणार आहे. यामध्ये श्री गणेश पूजन, पुण्य हवाचन, नंदिग्राम मुख्य देवता स्थापन, रजत पादुकाचल, प्राणप्रतिष्ठा होणार आहे. यावेळी ह. भ. प. कल्याण महाराज, राजेंद्र शहाणे महाराज, धनंजय उदावंत महाराज, मौनानंदजी महाराज, (परभणी) नाथ माऊली जोजारे महाराज, तसेच दुपारी १२ वा. महाप्रसादाचे वाटप करण्यात येईल.

## रामनवमीनिमित्त वाहतूक मार्गात बदल

समाचार/नगर-दि.१५

रामनवमी उत्सवानिमित्ताने सालाबादप्रमाणे शिर्डी येथे भाविक साईबाबांच्या दर्शनासाठी येणार असल्याने भाविकांची व वाहनांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होणार आहे. गर्दीमुळे भाविकांची व जनतेची गैरसोय होऊ नये यासाठी जिल्हा पोलिस अधीक्षक राकेश ओला यांनी दि. १६ ते १८ एप्रिल या कालावधीत नगरकडून मनमाडकडे येणाऱ्या खासगी व प्रवासी वाहतुकीच्या मार्गात बदल करण्याचे आदेश जारी केले आहेत. अहमदनगरकडून मनमाडकडे येणारे खासगी व प्रवासी व इतर मोठ्या वाहनांसाठी वाहतुकीसाठी मार्ग आरबीएल चौक, द्वारका सर्कल चौक, साईनाथ हॉस्पिटल चौक-राम सर्कल चौक- झुलेलाल चौक- लक्ष्मीनगर चौकटी- पॉईंट असा असणार आहे.

अहमदनगरकडून मनमाडकडे येणारी खासगी व प्रवासी व इतर मोठ्या वाहनांसाठी लक्ष्मीनगर चौक टी- पॉईंट-झुलेलाल चौक-राम सर्कल चौक-साईनाथ हॉस्पिटल चौक-द्वारका सर्कल चौक-आरबीएल चौक या रोडवरील येणारी सर्व वाहतूक वळविण्यात आली असल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

# जाहिरातीतले दावे आणि सत्यता

## जाहिरात'बाजी'

हाडे होतील मजबूत आणि तुम्ही व्हाल स्ट्रॉंग अशा प्रकारच्या जाहिराती आपण अनेक वर्षांपासून ऐकत आलो आहोत. जाहिराती मुळातच प्रॉडक्टकडे किंवा सर्व्हिसकडे ग्राहक आकर्षित व्हावेत ह्यासाठी असतात. मग आता सुप्रीम कोर्टाने काही जाहिरातींना चाप का बसवला आहे?




बरोबर एक वर्षापूर्वीची घटना. रेवंत हिमतसिंगका म्हणून एक सोशल मीडिया इंफ्ल्यूएन्सर आहे. फूड-फार्मर नावाचे त्याचे इन्स्टाग्राम आणि युट्यूब हँडल आहे. अमेरिकेत शिक्षण घेऊन वॉल स्ट्रीटवरील मोठ्या पगाराचा जॉब सोडून भारतात येऊन तरुणांसाठी काम करणारा युवक. कॅडबरीने (बोर्नव्हीटा) त्याला गेल्यावर्षी एक नोटीस बजावली होती. रेवन्तने एका व्हिडिओत हेल्थ ड्रिंक म्हणून जाहिराती केल्या जाणाऱ्या बोर्नव्हीटामध्ये अतिप्रमाणात असलेल्या साखरेच्या प्रमाणाबद्दल आक्षेप उपस्थित केला होता आणि त्याविरोधात त्याला कोर्ट केसला सामोरे जावे लागले. गेल्या आठवड्यात त्यासंदर्भात केंद्रीय मंत्रालयाने एक निर्देश जारी केला की बोर्नव्हिटा आणि तत्सम कॅटेगरीमधल्या उत्पादनांनी त्यांच्या जाहिराती किंवा प्रॉडक्टवर हेल्थ ड्रिंक असा शब्दप्रयोग करू नये.

रेवन्त नावानुसारच हिंमतवान निघाला. त्याने मागच्या वर्षभरात यच्चयावत खाद्य उत्पादनांची चिरफाड केली. कशामध्ये पाम तेल आहे, कोणत्या गोष्टीत साखर किती प्रमाणात आहे वगैरे वगैरे. त्याचे व्हिडिओ तुम्ही युट्यूब किंवा इंस्टाग्रामवर पाहू शकता. रेवन्तने मोठ्या धेंडांशी पंगा घेतला, आता त्याचे काही खरे नाही असा माहोल तयार झालेला. पण त्याचे व्हिडिओ पाहून लोकांमध्ये जागृती व्हायला सुरुवात झाली. प्रत्येक उत्पादनाच्या मागे त्याच्यात काय काय वापरले आहे याची यादी पाहायला लोकांनी सुरुवात केली.

म्हणजे पोषणमूल्य असलेले आटा बिस्कीट अशी जाहिरात करणाऱ्या बिस्किटांचे रॅपर पाहिले असता असे लक्षात येते की त्यात आटा कमी आणि मैदा जास्त, पाम तेलाचा वापर जास्त वगैरे वगैरे अनेक गोष्टी दिसू लागल्या. ब्राऊन ब्रेड हे असेच एक फसवे उत्पादन. त्यात मैदा हा असतोच. त्यातच रामदेव बाबा यांच्या पतंजली कंपनीकडून त्यांच्या उत्पादनासंदर्भात केली जाणारी लोपॅथीला विरोध करणारी जाहिरात वादात होती. सुप्रीम कोर्टाने त्यावर पतंजली कंपनीवर ताशेरे ओढले. रामदेवबाबा आणि योगी बालकृष्ण ह्यांनी सुप्रीम कोर्टात बिनशर्त माफी देखील मागितली.

ग्राहक भुलतील अशा पद्धतीने जाहिराती सातत्याने केल्या जातात. फेअर अँड लव्हलीची जाहिरात तर अनेकांना गोरं होता येईल असं वाटावी अशीच होती. अनेक वर्ष तशी जाहिरात झाल्यावर त्या उत्पादनाचे नाव ग्लो अँड लव्हली केलं गेलं. सध्या स्टिंग हे शीतपेय गाजते आहे. त्यात असलेल्या साखरेचे प्रमाण पाहिल्यास उसाच्या रसालाही मागे टाकेल की काय अशी शंका येते. मँगो पल्प असलेली सगळी शीतपेये पाहता त्यात असलेल्या आंब्याचे प्रमाण अगदीच नगण्य असते.

इथूनपुढे प्रत्येक खाद्य उत्पादन विकत घेण्यापूर्वी त्यात काय काय आहे हे एकदातरी जरूर पाहावे. जाहिरातबाजी हे सदर जाहिराती आणि त्यांच्या गमती जमती बद्दल तर आहेच पण सुजाण ग्राहक म्हणून आपणही सजग होणे अत्यावश्यक आहे. त्याचसाठी हा लेखप्रपंच.

**- शंतनू खानवेलकर**

मो. ९८९०२५२७७१




### राशीभविष्य

- **मेष** : कामापासून लक्ष विचलित होईल. वाहन, यंत्राचा वापर जपून करावा. प्रकृतीस त्रास संभवतो.
- **वृषभ** : अंगभूत कला-गुणांना वाव मिळेल. मुलांचे प्रश्न मार्गी लागतील. यांत्रिक क्षेत्रात संधी लाभतील.
- **मिथुन** : आर्थिक प्रश्नात समाधान लाभेल. महत्त्वाच्या भेटीतून लाभ होईल. प्रवासात काळजी घ्यावी.
- **कर्क** : अपेक्षेपेक्षा अधिक खर्च होईल. घर दुरूस्ती मार्गी लागेल. विवाहाची बोलणी सफल होतील.
- **सिंह** : सरकारी कामं रखडतील. कायदेशीर बाबतीत विचारानं रहावं. बेरोजगारांना दिलासा मिळेल.
- **कन्या** : स्थावर प्रश्नात समाधान लाभेल. कर्ज प्रकरणं मार्गी लागतील. प्रियजनांचा सहवास लाभेल.
- **तूळ** : नोकरी-व्यवसायात प्रभाव राहील. नव्या विचारांना चालना मिळेल. कौटुंबिक सौख्य अनुभवाल.
- **वृश्चिक** : कलाकारांचा उत्साह वाढेल. व्यवसायात विचारानं रहावं. अनुभवींचं मार्गदर्शन कामी येईल.
- **धनु** : स्थावर प्रश्नात लाभ संभवतो. मित्र-नातलगांचं सहकार्य लाभेल. ग्रहमानाची अनुकूलता लाभेल.
- **मकर** : चैनीवर अधिक खर्च होईल. जुनी येणी सहज वसूल होतील. अकारण ताण टाळायला हवा.
- **कुंभ** : सार्वजनिक क्षेत्रात संधी लाभतील. गुंतवणूक विचारानं करावी. व्यवसायात बदलाचा विचार होईल.
- **मीन** : अनपेक्षित घटना चिंता वाढवतील. कौटुंबिक सहलीचं समाधान लाभेल. धनलाभाचे योग आहेत.

### दिन विशेष

**१६ एप्रिल**

**२०१३ :** आखाती देश, पाकिस्तान आणि उत्तर भारत ७.४ रिश्टर स्केलच्या भूकंपाने हादरला.
**२०१४ :** दक्षिण कोरियात जहाज बुडाले. शालेय मुलांसह २९२ जण बेपत्ता.
**२०१६ :** सरकारी निवासस्थानाच्या भाड्यावरून वादाच्या भोवऱ्यात अडकलेल्या प्रियांका गांधी यांनी नमती भूमिका घेतली.
**२०१७ :** 'तोंडी तलाक'च्या मुद्याला थेट स्पर्श करत पंतप्रधान नरेंद्र मोदींनी मुस्लिम महिलांना न्याय मिळालाच पाहिजे, असं आग्रही मत मांडलं.

### आरोग्यमंत्र — केसांच्या समस्येने हैराण?

आपल्याकडे आहारात कांद्याचा आवर्जून वापर केला जातो. कांद्याचे विविध औषधी गुणधर्मही अनेकांच्या परिचयाचे आहेत. परंतु कांद्याच्या वापराने केसांच्या समस्या दूर होऊ शकतात. त्यासाठी काय करायला हवं, हे जाणून घेऊ... * दोन चमचे कांद्याच्या रसात चमचाभर ऑलिव्ह ऑईल मिसळा. हे मिश्रण आठवड्यातून दोन वेळा केसांच्या मुळांना आाणि स्कॅल्पला लावा. यामुळे केस गळणं कमी होऊन केसांची वाढ वेगाने होईल.



* दोन चमचे कांद्याच्या रसात चमचाभर खोबरेल तेल मिसळा. हे मिश्रण रात्री केसांना लावा आणि सकाळी धुवून टाका. केसांची वाढ होण्यास मदत होईल.

* दोन चमचे कांद्याच्या रसात चमचाभर मध घाला. केसांना लावा. तासाभराने धुवून टाका. यामुळेही केस दाट आणि लांब होतील.


* कांद्याच्या दोन चमचे रसात लिंबाचा रस मिसळून केसांवर लावा. तासाभराने धुवून टाका. आठवड्यातून दोन वेळा हा उपाय करा. यामुळे कोंड्याची समस्या दूर होईल आणि केस मऊ होतील.

* कांद्याच्या दोन चमचे रसात आंबट दही, लिंबाचा रस घाला. याने स्कॅल्पवर मसाज करा. अर्ध्या तासाने धुवा. केस बळकट होतील.

### महत्त्वपूर्ण काही — दुसरी पृथ्वी!

आपल्या पृथ्वीवर जीवसृष्टी बहरली त्याला आता लाखो वर्षं उलटून गेली. पृथ्वीप्रमाणेच आपल्या अंतराळात दुसऱ्या कोणत्या ग्रहावर जीवसृष्टी आहे का, याचा शोध अनेक वर्षांपासून चालू आहे. अंतराळ संशोधन करणाऱ्या अमेरिकेतल्या 'नासा' या संस्थेला पृथ्वीशी मिळताजुळता एक ग्रह सापडलाय. या ग्रहावर जीवसृष्टी असावी, असा शास्त्रज्ञांचा अंदाज आहे. हा ग्रह आपल्या सूर्यमालेच्या बाहेर आहे. नासाच्या केपलर या दुर्बिणीने हा शोध लावलाय. शास्त्रज्ञांच्या मते, या ग्रहावर पृथ्वीसारखंच वातावरण आहे. नासानं या ग्रहाला 'केपलर-४५२' हे नाव दिलंय. हा ग्रह 'जी २' नावाच्या ताऱ्याभोवती फिरतो. हा सूर्यासारखाच एक तारा, त्याच्यापेक्षा सव्वा अब्ज वर्षांनी मोठा आहे तर नव्या ग्रहाचा आकारही पृथ्वीच्या तुलनेत ६० टक्क्यांनी जास्त आहे. पृथ्वीपासून हा तारा १४०० प्रकाशवर्षं लांब आहे. पृथ्वी आणि सूर्य यांच्यापेक्षा बरीच वर्ष आधी या ग्रहाची निर्मिती झाली तसेच तापमानही पृथ्वीशी मिळतंजुळतं आहे. त्यामुळेच या ग्रहावर जीवसृष्टी असण्याची शक्यता बळावली आहे.

### सल्ला मोलाचा — अशी बहरेल बाग



झाडांना सूर्यप्रकाशाची गरज असते. आपल्याला कुठल्या झाडाला किती सूर्यप्रकाश हवा याची माहिती असतेच असं नाही. रोपट्यांना कमी किंवा अधिक सूर्यप्रकाश देणं घातक ठरू शकतं. त्यामुळे रोपट्यांना योग्य सूर्यप्रकाश द्यायला हवा. * झाडांना भरपूर पाणी घातलं जातं. पण जास्त पाणी घातल्याने रोपटी कोमेजू शकतात. हे लक्षात घेता रोपट्यांना गरजे इतकंच पाणी घाला. * झाडं वाढण्यासाठी सूर्यप्रकाश आणि पाणी या दोनच गोष्टींची गरज असते असं आपल्याला वाटत असतं. पण प्रत्यक्षात झाडांच्या वाढीसाठी १६ पोषक घटकांची आवश्यकता असते. जमिनीतून ही पोषकतत्त्व मिळतात. त्यामुळे झाडाला चांगलं खत घालावं. * दोन रोपट्यांच्या मध्ये मोकळी जागा असावी. * चुकीच्या ऋतूत चुकीची झाडं लावल्याने बरंच नुकसान होतं. त्यामुळे ऋतूला साजेशी रोपटी लावा.

### पंचांग

**मंगळवार, १६ एप्रिल २०२४**
क्रोधीनाम संवत्सर, शके १९४६,
चैत्र शु. ८, नक्षत्र : पुष्य
चंद्रराशी : कर्क, धृति योग
सूर्योदय: ६.२३, सूर्यास्त: ६.५४

### फॉरवर्डस

**काही माणसं भावना दडवून नाटकी वागू शकतात. पण...** दिल से दिल मिले या ना मिले हाथ मिलाओ, हमको ये सलीका भी... बडी देर से आया

### टेक्नो टॉक

फोन हरवल्यावर कॉन्टॅक्ट्स परत मिळवण्याचे काही उपाय. * अँड्रॉइड युजर्स 'सुपर बॅकअप' ॲपचा वापर करून नंबर्सचा बॅकअप घेऊ शकतात. फोनच्या इंटर्नल स्टोअरेजमध्ये बॅकअप सेव्ह होईल. 'ऑटोमॅटिक अपडेट' हा ऑप्शन निवडल्यास बॅकअप नियमित घेतला जाईल. * आयफोन युजर्स 'माय कॉंटॅक्टस बॅकअप प्रो' या ॲपचा वापर करून नंबर्सचा बॅक अप घेऊ शकतात. * कॉंटॅक्टसच्या ऑटोमॅटिक बॅक अपसाठी '६ डिग्रीज' आणि 'ॲडॅप्ट' ॲपचा वापर करता येईल. फोनबुकमध्ये नवीन कॉंटॅक्ट ॲड झाला की तो हे ॲप अपडेट करेल.

### करिअरवाटा — भाषा विज्ञानाची हटके वाट

भाषा विज्ञान या शाखेत उत्पत्ती, स्वरूप, विकास आदींचा वैज्ञानिक आणि विश्लेषणात्मक अभ्यास केला जातो. विषय विभाजनाच्या दृष्टीतून याला भाषा संरचना आणि अर्थ अध्ययन या दोन गटात विभागलं जातं. यात विविध भाषांचं वैज्ञानिक दृष्टिकोनातून विश्लेषण केलं जातं, त्यांचा तुलनात्मक अभ्यासही केला जातो. जगभरात अक्षरश: हजारो भाषा बोलल्या जातात आणि या सगळ्या ध्वनीवर आधारित असतात. व्याकरण आणि लिपीतील विविधतेनं भाषेला वेगवेगळी स्वरूपं दिली आहेत. या अंतर्गत ध्वनी, उच्चारण, अनुवाद कार्य करता येतं. कोणत्या क्षेत्रात संधी आहेत? भाषा विज्ञानात शिक्षण घेतल्यानंतर पुढील क्षेत्रात करियरच्या संधी असतात, फिलोलॉजिस्ट, लिंग्विस्ट, इंटरप्रेटर (दुभाषी), अनुवादक (स्क्रिप्टोलॉजी), संगणकीकरण, गणितीय भाषा, अनुप्रयोग भाषा विज्ञान, डायलेक्टॉलॉजी, एपिग्राफर. एकूण बदलत्या परिस्थितीत या क्षेत्रातल्या करियर संधीही वाढत आहेत. अभ्यासक्रम कुठून कराल? महाराष्ट्रात मुंबई विद्यापीठात अशा प्रकारचा कोर्स उपलब्ध आहेत. नामवंत खाजगी संस्थांमधूनही विविध भाषा विज्ञानाचे कोर्सेस उपलब्ध आहेत.



### खेचाखेची — सिस्टीमप्रमाणे...

एकदा एक माणूस तपश्चर्येला बसला. देव प्रसन्न झाला आणि म्हणाला, 'माग वत्सा, हवा तो वर माग.'
माणूस: देवा, हे काही बरं नाही केलंस तू. तू सिस्टीमप्रमाणेच वागायला पाहिजे.
देव: काय झालं? काय केलं मी?
माणूस: तू डायरेक्ट प्रसन्न झालास मला.
पूर्वी ऋषीमुनी तपश्चर्येला बसले की त्यांची साधना भंग करायला अप्सरेला पाठवायचा तू...

### वेगळं काही

आपला रंग बदलण्यात सरडा हुशार असतो, असं म्हटलं जातं. पण, एखादा पर्वतही सरड्याप्रमाणे रंग बदलू शकतो, असं आपण कधी ऐकलं आहे का? ऐकलं नसेल तर असे रंग बदलणारा पर्वत आईसलॅंडच्या फजलाबक नेचर रिझर्व्हमध्ये हजर आहे. या पर्वताचं वैशिष्ट्य म्हणजे हवामानाबरोबर या पर्वताचा रंग बदलत जातो. हे ऐकून आपल्याला आश्चर्य वाटलं असलं तरी ही वस्तुस्थिती आहे. अलीकडेच एंड्रो लोरिया या ५० वर्षीय ब्रिटीश फोटोग्राफरने या पर्वताचे अनेक फोटो आपल्या कॅमेऱ्यात कैद केले आहेत. पर्वत आपल्या रंगात कसा बदल करतो, याचं स्पष्टीकरण मिळलेलं नाही.

### फॅशन पॅशन — राशीनुसार पेहरावाची निवड

सध्याच्या फॅशन जगतात अनेकविध पर्याय उपलब्ध असले तरी आपल्याला कोणता पेहराव अधिक उपयुक्त ठरेल, असा प्रश्न अनेकींना सतावतो. त्यादृष्टीने राशीनुसार पेहरावाचे रंग कसे निवडावे याचा हा कानमंत्र...



* **मेष** – मेष राशीच्या महिलांनी पेस्टल रंगाचे पेहराव निवडल्यास व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव वाढतो. * **वृषभ** – या राशीच्या महिला नवनवीन ट्रेंड्स आजमावण्यात अग्रेसर असतात. त्यांनी पांढऱ्या रंगाला प्राधान्य द्यावं. * **मिथुन** – मिथुन राशीच्या महिलांनी महत्त्वाच्या प्रसंगी फिकट हिरव्या रंगाच्या छटेतील पेहरावाला प्राधान्य द्यावं. * **कर्क** – या राशीच्या महिलांनी सकारात्मक विचारास कारक ठरणाऱ्या पांढऱ्या किंवा फिकट पिवळ्या रंगाच्या पेहरावास प्राधान्य द्यावं. * **सिंह** – पेहराव निवडीबाबत सिंह राशीच्या महिला फारशा चोखंदळ नसतात. पण त्यांनी वॉर्डरोबमध्ये लाल, पिवळ्या, नारंगी स्थान द्यायला हवं. * **कन्या** – या राशीच्या महिलांनी बिघडलेले नातेसंबंध सुधारण्यासाठी पोपटी आणि ग्रे शेडमधील प्रावरणं वापरावी.

Printed and Published by: Swati Mahendra Kulkarni, Printed at "Samachar" 4188, Maidan Aad, Ahmednagar(M Corp), Dist.Ahmednagar, Pin Code - 414 001, Maharastra, Published at 4188, Maidan Aad, Ahmednagar(M Corp), Dist Ahmednagar, Pin Code- 414 001, Maharashtra. Editor- Swati Mahendra Kulkarni, Phone - (0241) 2345270, 2347086, Mob.- 9822470074.
हे मराठी सायंदैनिक, मुद्रक, प्रकाशक स्वाती महेंद्र कुलकर्णी यांनी ''समाचार'' ४१८८, मैदान आड, अहमदनगर (एम कॉर्प), जिल्हा-अहमदनगर, पिन कोड- ४१४ ००१, महाराष्ट्र येथे मुद्रित करून ४१८८, मैदान आड, अहमदनगर (एम कॉर्प) जिल्हा- अहमदनगर, पिन कोड- ४१४ ००१, महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक- स्वाती महेंद्र कुलकर्णी. दूरध्वनी- २३४५२७०, २३४७०८६, मो.- ९८२२४७००७४ E-mail - mahendra.samachar@gmail.com

**सुविचार**

प्रत्येकाजवळ काहीना काही विशिष्ट शक्ती असते तिचा शोध घेण आणि लोकांच्या भल्यासाठी वापर करण ही आपली जबाबदारी आहे.
संकलित

**सामान्यज्ञान**

पहिली जेट विमान सेवा ही बीओसीने सुरुवात केली. जेट विमानाचे नाव होते डी हावीलँड कॉमेट.
संकलन - अरविंद ब्राम्हणे


# समाचार

सोमवार, दि. १५ एप्रिल २०२४ पान ३


## जैन ओसवाल पतसंस्थेत जयंतीनिमित्त अभिवादन

# सुवालाल गुंदेचा यांचे स्वप्न साकारण्याचा आनंद - गांधी



**समाचार/नगर-दि.१५**

सहकारमहर्षी सुवालाल गुंदेचा हे नगर शहर तसेच जिल्ह्यातील सहकारी बँकींग क्षेत्राचे चालताबोलते विद्यापीठ होते. जैन ओसवाल पंचायत नागरी सहकारी पतसंस्थेचे ते संस्थापक असून त्यांच्याच मार्गदर्शनाखाली या पतसंस्थेची यशस्वी घोडदौड चालू आहे. त्यांचे विचार आमच्यासाठी कायम मार्गदर्शक आहेत, संस्थेची स्वमालकीची ईमारत, १०० कोटींच्या ठेवी हे त्यांचे स्वप्न साकार करण्यात आमचा खारीचा वाटा आहे हे नेहमीच अभिमानास्पद वाटते असे प्रतिपादन सहकारमहर्षी सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल पतसंस्थेचे अध्यक्ष संतोष गांधी यांनी केले.

सहकारमहर्षी सुवालालजी गुंदेचा यांच्या जयंतीनिमित्त सहकारमहर्षी सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल पतसंस्थेच्या मुख्यालयात त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी संचालक मनोज गुंदेचा, शांतीलाल गुगळे,विनय भांड सरव्यवस्थापक प्रशांत भंडारी, मार्केट यार्ड शाखेचे व्यवस्थापक मनोज लुणिया, सभासद उमेश गिल्डा, प्रमोद डागा, गोकुळ लाहोटी, हेमंत मुथा, राजेंद्र गांधी, सहायक व्यवस्थापक नयना बोगावत यांच्यासह कर्मचारी उपस्थित होते

संतोष गांधी पुढे म्हणाले की, सहकारी पतसंस्था क्षेत्रात आमच्यासारख्या युवा पिढीसाठी त्यांनी घालून दिलेले आदर्श कायम दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शक आहेत. त्यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली तयार होण्याची संधी आम्हाला मिळाली. सभासद उमेश गिल्डा म्हणाले की, सहकारमहर्षी सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल नागरी सहकारी पतसंस्था आज यशोशिखवर आहे. या संस्थेचे सभासद असल्याचा नेहमीच अभिमान वाटतो, प्रशांत भंडारी यांनी शेवटी आभार मानले.

# जिल्हा वाचनालयात व्यक्तिमत्व विकास शिबीर

**समाचार/नगर-दि.१५**

अहमदनगर जिल्हा वाचनालयाच्या वतीने यावर्षी इ.२ री ते ८ वी च्या मुला-मुलींसाठी सुट्टीत म्हणजेच मंगळवार दि.१९ ते २९ एप्रिल कालावधीत व्यक्तीमत्व विकास शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.

दि.१९ एप्रिल पासून रोज सकाळी ९.३० ते ११.३० या वेळेत हे शिबीर होणार असून, तज्ञ प्रा. ज्योती कुलकर्णी या श्लोक व स्तोत्रे, बौद्धीक खेळ, नाटक, कथाकथन व वक्तृत्व, बुद्धि आणि मनाची एकाग्रता, आहार व आणि आरोग्य व व्यायाम, हस्तकला, सुखी जीवनाचा मंत्र इत्यादी सारख्या जीवनात उपयोगी पडणाऱ्या महत्वाच्या विषयांवर मार्गदर्शन करणार आहेत. तसेच भूषण देशमुख, शिवाजी नाईकवाडी, अमोल बागुल, महेंद्र कदम, मनिषा कदम, स्वानंदी भारताल, घन:श्याम सानप, साहित्यिक सुभाष सोनवणे, भाऊसाहेब गवळी, सुवेंद्र शिंदे, ठाकूरदास परदेशी, दिवाकर भोयर आदि मान्यवर मुलांना मार्गदर्शन करणार आहेत.शिबीरात मुलांसाठी गोष्टी, गाणी इत्यादी बरोबर सहजीवनाचे धडे देण्यात येणार आहेत.

# मोदींचे हात बळकट करण्यासाठी सुजय विखेंना साथ द्या- नागवडे

**समाचार/नगर-दि.१५**



श्रीगोंदा तालुक्यातून खा. सुजय विखे यांना मोठी आघाडी देण्याची जबाबदारी प्रत्येक कार्यकर्त्यांवर आहे. खा. विखे यांच्या माध्यमातून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे हात बळकट करावेत, असे आवाहन राष्ट्रवादीच्या महिला जिल्हाध्यक्षा अनुराधा नागवडे यांनी केले आहे.

नागवडे म्हणाल्या की, पंतप्रधान नरेंद मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशाने मोठी प्रगती केली आहे. राज्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वात महायुतीचे सरकार उत्तम काम करीत आहे.

सरकारच्या माध्यमातून लोककल्याणकारी योजना राबविल्या जात आहेत. खा. विखे यांनी लोकांना अपेक्षित अशी विविध कामे केली आहेत. रस्त्यांचे प्रश्न त्यांनी मार्गी लावले आहेत. त्यामुळे त्यांना पुन्हा संसदेत पाठविण्याची जबाबदारी श्रीगोंदेकरांची आहे. कार्यकर्त्यांनी श्रीगोंदा तालुक्यातील प्रत्येक घरोघरी कमळ चिन्ह पोहोचवावे, असे आवाहन नागवडे यांनी केले. नरेंद्र मोदी पुन्हा देशाचे पंतप्रधान होणार आहेत, हा संपूर्ण जगाला विश्वास आहे. त्यामुळेच जगातील मोठे उद्योग भारतात येण्यासाठी आतुर आहेत. यावेळी भाजपा ४०० पारचा आकडा गाठणार आहे, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## पान १ वरुन

### मोदी गॅरंटी- फडणवीस

आहे आणि पण आमच्यासाठी जाहीरनामा हा संकल्प आहे. काँग्रेसने दिलेली आश्वासने पूर्ण केली जात नाहीत. राहुल गांधी स्वत: वाचत नाहीत. त्यांना कुणीतरी फिड करत असते. काँग्रेसचा जाहीरनामा हा फेल जाहीरनामा आहे, अशी टीका त्यांनी केली आहे. दरम्यान, अग्निवीर योजना रद्द करणे म्हणजे देशाला धोक्यात टाकणे आहे. देशातील सैन्य युवा असले पाहिजे, जे इतर देशात आहे. आज देशात मोठ्या प्रमाणात अग्निवीर भरती झालेले आहेत आणि ते देशाच्या सीमेवर लोकांचे रक्षण करत आहेत, असे फडणवीसांनी सांगितले.

### लुटणारे आरोपी १२ तासात जेरबंद

फिर्यादीच्या नाकावर दगड मारून फिर्यादीस जखमी केले. याप्रकरणी भिंगार कॅम्प पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. भिंगार कॅम्प पोलिसांनी तांत्रिक विश्लेषणाव्दारे या घटनेचा तपास केला. पोलिस अंमलदारांनी सीसीटीव्ही फुटेज तपासले. अंमलदारांनी दोघा आरोपींना वेगवेगळ्या ठिकाणाहून ताब्यात घेतले. त्यांनी त्याचे नाव फरहान फिरोज खान (वय २३, रा. मुकुंदनगर), भारत अशोक गायकवाड (रा. दगडीचाळ, मुकुंदनगर) अशी असल्याचे सांगितले. तर अन्य चार जण हे अल्पवयीन असल्याचे तपासात निष्पन्न झाले. त्यांच्याकडून गुन्ह्यात वापरलेली कार जप्त करण्यात आली आहे. पुढील तपास उपनिरीक्षक किरण साळुंके करीत आहेत.

### दोन सराईतांच्या आवळल्या मुसक्या

ते गुन्ह्यात चोरी केलेले सोन्याचे दागिने विक्री करण्यासाठी प्रवरासंगम, ता. नेवासा येथील बस स्टॅण्ड येथे उभे आहेत. ते गंगापूर येथे जाणार आहेत, अशी माहिती मिळाली. पथकाने तेथे जाऊन त्यांना ताब्यात घेतले. त्यांनी त्यांचे नाव आकाश ऊर्फ ताकसाहेब छगन काळे (वय २२, रा. आंतापुर, ता. गंगापुर, जि. छत्रपती संभाजीनगर), कुनत्या बंडु भोसले (वय २५, रा. बाबरगाव, ता. गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर) असे असल्याचे सांगितले. काळे याच्या अंगझडतीत २८ हजार रूपये किमतीचे ४ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने मिळुन आले. सोन्याचे दागिने हे त्यांचे इतर साथीदार अभिष छगन काळे (पसार) व गुंड्या डिचार्ज काळे (पसार) दोन्ही रा. आंतापूर, ता. गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर यांनी मिळुन ५-६ महिन्यांपुर्वी नेवासा फाटा परिसरात दिवसा घरफोडी करुन तेथुन चोरुन आणलेले असल्याचे सांगितले. ताब्यातील आरोपींकडे गुन्ह्यातील उर्वरीत सोन्याच्या दागिन्याबाबत विचारपूस केली असता, आरोपींनी उर्वरीत सोने हे गंगापूर येथील ज्योर्तीलिंग ज्वेलर्स दुकानाचे मालक आनंदराव निवृत्ती पाटील यांना विकल्याचे सांगितल्याने त्यांना ताब्यात घेऊन पुढील तपासकामी नेवासा पोलीस ठाण्यात हजर केले आहे.

## श्रीराम कथा महोत्सव; पुष्प दुसरे

# भ्रमणध्वनीला कुलूप नसलेले घर अयोध्या होय - प्रभूजी



**समाचार/नगर-दि.१५**

प्रभू श्रीरामांच्या प्रगट होण्याअगोदर अयोध्यानगरी सुरक्षित होती. सूक्ष्म तत्त्वांचेही संरक्षण या नगरीत होत होते. कोणतेही नैसर्गिक संकट अयोध्येवर येत नव्हते. या नगरीत घराला कुलूप नसायची कारण चोरी होतच नव्हती. आज एका घरात रहाणाऱ्या चार जणांच्याही भ्रमणध्वनीला कुलूप असते. ज्या घरात कोणाच्याही भ्रमणध्वनीला कुलूप नसते ते घर अयोध्या होय, असे श्रीमान गौरांगप्रिय प्रभुजी यांनी सांगितले.

पाईपलाइन रोडवरील कादंबरीनगरीत इस्कॉन मंदिरात सुरु असलेल्या श्रीराम कथा महोत्सवाचे व्दितीय पुष्प गुंफताना ते बोलत होते. व्यासपीठासमोर इस्कॉन मंदिराचे व्यवस्थापक श्रीगिरीवरधारी प्रभूजी यांच्यासह स्त्री-पुरुष भक्तगण मोठ्या संख्येने विराजमान झाले होते. लहान मुलांचीही उपस्थिती उपस्थिती होती.

प्रभुजी म्हणाले, रामायण उत्तम भक्तांची, भक्तांच्या तपश्चर्येची कथा आहे. सीतामाई, लक्ष्मण, हनुमान, जटायू, बिभिषण, शबरी आदी उत्तम भक्तांची श्रध्दा आणि उत्तम भावना रामायणातील कथांमधून समोर येते. रामायणात भक्तांच्या समर्पणाच्या कथा आहेत. त्यागाच्या परिसिमा असलेल्या कथा आहेत. या अद्‌भूत भक्तांच्या कथा ऐकताना ह्दयात भक्तिभाव उत्पन्न होतात. भक्तांच्या सद्‌ गुणांच्या कथा ऐकताना नातेसंबंध कसे असावे? कसे जपावे? हे कळते.

अनेकविध सिध्दांत मांडत श्रीरामायण कथेतील प्रसंग डोळ्यांसमोर उभे करताना त्यातील बारकावे दाखवून देण्याची प्रभुजी यांची वत्कृत्व शैली श्रोत्यांना राममय व्हावयास लावते. कथा महोत्सवास मिळणारी गायनाची आणि वादनाची सुरेल साथ भक्तांना देहभान हरपण्याचा आनंद देत असल्याचे दिसून येत आहे.

# निधन वार्ता

## राजेंद्र गुंदेचा



**समाचार/नगर-दि.१५**

आनंदऋषीजी हॉस्पिटल मार्ग, अर्बन बँक कॉलनी येथील रहिवासी राजेंद्र चांदमल गुंदेचा (गंगापुरवाला) यांचे नुकतेच हृदयविकाराने निधन झाले. ते ७० वर्षांचे होते. त्यांच्यावर नालेगांव अमरधाम स्मशानभुमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात दोन मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. ते मनमिळावू व धार्मिक वृत्तीचे होते. ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज यांचे ते निस्सीम भक्त होते. गेल्या १५ वर्षांपासून ते दिंडीला अन्नदान करीत. शिलाविहार येथील नवीन मंदिर उभारणीसाठी त्यांनी मोठे योगदान दिले. त्यांच्या निधनाबद्दल ब्रह्मचैतन्य सेवाभावी मंडळाचे सुंदरदास रिंगणे, रेखाताई रिंगणे यांनी दु:ख व्यक्त केले. मंडळाच्या सदस्यांनी त्यांना श्रद्धांजली अर्पण केली.

## मंजुषा काकाणी



**समाचार/नगर-दि.१५**

ॲड. अरविंद काकाणी यांच्या पत्नी मंजुषा अरविंद काकाणी यांचे रविवारी अल्पशा आजाराने मुंबई येथे उपचारा दरम्यान निधन झाले. त्यांनी दोन्ही किडन्या आणि लिव्हर दान केले. त्यांचा स्वभाव अतिशय धार्मिक व प्रेमळ होता. त्या मनमिळावू स्वभावाच्या होत्या. सोमवारी सायंकाळी ५ वा. अमरधाम येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रातील व्यक्ती उपस्थित होते. त्यांच्या पश्चात पती, एक मुलगा, एक मुलगी, जावई, सासू-सासरे, मोठे दीर, भावजयी असा आहे.

## आनंदराव पडोळे



**समाचार/नगर-दि.१५**

आनंदराव गणपत पडोळे यांचे दि. १४ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. ते ७५ वर्षांचे होते. त्यांच्या मागे पत्नी, दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या निधनाने हळहळ व्यक्त होत आहे.

## जानकीबाई पडोळे



**समाचार/नगर-दि.१५**

जानकीबाई लक्ष्मण पडोळे यांचे दि.१४ रोजी निधन झाले. त्यांच्या मागे तीन मुले, एक मुलगी, ६ पुतणे व ४ पुतणी असा परिवार आहे. कै. रामशेठ पडोळे आणि गोरक्ष पडोळे, सतीश पडोळे यांच्या त्या मातोश्री होत. चंद्रमा केटर्सचे नीलेश आणि सूरज पडोळे यांच्या त्या आजी होत. त्या धार्मिक व मनमिळावू स्वभावाच्या होत्या.

# आय एम एस संस्थेच्या हातात शास्त्रीय नृत्याचे भवितव्य सुरक्षित -डॉ. दैठणकर

**समाचार/नगर-दि.१५**



संस्थेच्या शास्त्रीय नृत्य ॲकेडमीचा २२ वा वर्धापन दिन काल माऊली सभागृह येथे पार पडला. याप्रसंगी ज्येष्ठ भरतनाट्यम नृत्यागंना डॉ. स्वाती दैठणकर प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. यावेळी बोलताना त्या म्हणाल्या.उत्तम गुरूंच्या मार्गदर्शनाखाली संस्था प्रगती पथावर असून नृत्यासाधकांसाठी अतिशय भरीव कामगिरी करीत आहे. डॉ. शरद कोलतेंनी लावलेले रोपटे गगनावरी गेले आहे. डॉ. मेहता यांचे त्यांना उत्तम पाठबळ असून डॉ. ऋचा तांदुळवाडकर यांनी संस्थेची धुरा योग्यरित्या प्रामाणिकपणे संभाळलेली आहे. चैत्राली पांडे यांनी गेली ५ वर्षे समर्थपणे प्राचार्य पदाची जबाबदारी पाडली असून आश्लेषा पोतदार व उत्कर्षा दगडे यांचे त्यांना सहकार्य लाभले आहे. ॲकॅडमीच्या संर्वागीण विकसात सर्वतोपरी पाठिंबा आणि मार्गदर्शन सदैव राहील, असा त्यांनी विश्वास व्यक्त केला. यावेळी आयएमएचचे माजी संचालक डॉ शरद कोलते, संचालक डॉ एम. बी. मेहता,उपसंचालक डॉ विक्रम बार्नबास संस्थेचा सर्व स्टाफ तसेच विद्यार्थी व पालकही मोठ्या संख्येने उपस्थित होते.

डॉ शरद कोलते म्हणाले, अनेक वर्षांपूर्वी मी एक स्वप्न बघितले होते, शास्त्रीय नृत्य संवर्धनाचे, आणि त्यावेळी अनपेक्षित अशी संधी मिळाली. त्यासाठी लागणारी शिस्तबद्धता, नियोजन, अविरत मेहनतीद्वारे संस्थेतील विद्यार्थिनींनी तत्कालीन राष्ट्रपतींसमोर आपली नृत्यकला सादर करून संस्थेचा नावलौकिक वाढवला.

संस्थेच्या प्राचार्या चैत्राली पांडे यांनी वर्षभरातील कामगिरीचा आढावा घेत विद्यर्थिनींच्या यशाचा चढता आलेख सांगितला. आयएमएसचे संचालक डॉ एम बी मेहता यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करत संस्था आता वेगळ्या रुपात आपल्या समोर येणार आहे हे सांगितले. विद्यार्थिनींना अनेक वेगवेगळ्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी संस्था तत्पर आहे. संस्थेच्या समन्वयक डॉ ऋचा तांदुळवाडकर यांनी भविष्यातील संकल्पनांचा, उपक्रमांचा उल्लेख केला.

आश्लेषा पोतदार यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली तर उत्कर्षा दगडे यांनी आभार मानले.वर्धापन दिनाच्या ह्या नृत्यामहोत्सवाची सुरुवात सर्व मान्यवारांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. त्यानंतर कथक शिक्षिका उत्कर्षा दगडे आणि विद्यार्थिनींनी कथक नृत्यप्रस्तुती केली. उत्कर्षा यांच्या सौंदर्यपूर्ण 'निरतत ढंग' ह्या अष्टपदीने सुरुवात झाली. त्यानंतर 'ताल-धमार' प्रस्तुत झाले. प्रथम वर्षाच्या विद्यार्थिनींनी यमन रागातील सरगम प्रस्तुत केली.

त्यानंतर पंडित बिरजू महाराज रचित 'थूंग थूंगा कृष्णा' वर आधारित काव्य व नृत्य प्रस्तुत झाले. कार्यक्रमाची सांगता 'झुलत राधे नवल किशोर' या सुप्रसिद्ध झुल्याने झाली. सोहळ्यात तब्बल ४० विद्यार्थिनींना परीक्षेत धवल यश प्राप्त केल्याबद्दल ट्रॉफी व प्रशस्तीपत्रक देऊन गौरविण्यात आले. उत्तरार्धात भरतनाट्यमनृत्याच्या ६० विद्यार्थिनींचे सादरीकरण झाले. पहिल्या ते सहाव्या वर्षीच्या आणि गांधर्व परीक्षेच्या विद्यार्थिनींनी 'शिवपंचाक्षर स्तोत्र, राम स्तुती, कृष्ण स्तुती, नटेशकौतुवम, शिवस्तुती, मयूर अलारीपू' हे सर्व शास्त्रशुद्ध पद्धतीने सादर केल्या. शिक्षिका आश्लेषा ह्यांनी देवीची वेगवेगळी रूपे देवी स्तुतीतून उत्तम अभिनयाद्वारे सादर केली. संस्थेच्या प्राचार्या चैत्राली पांडे यांनी शिव शक्ती, पुरुष प्रकृतीची संकल्पना अर्धनारीतर स्तुतीद्वारे नृत्त-नृत्याचा मेळ साधत सादर करून प्रेक्षकांची दाद मिळवली. त्या नंतर श्लोकमद्वारे सर्व विद्यार्थिनींनी नृत्यसेवा ईश्वरचरणी अर्पण करून नृत्यमहोत्सवाची सांगता झाली. सर्व सादरीकरणाला रसिक प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी परिक्षेत उज्वल यश प्राप्त केल्याबद्दल स्मृतीचिन्ह व प्रशस्तीपत्रक देऊन सत्कार करण्यात आला.

## हनुमान चालिसा



**मंगल भक्त सेवा मंडळ**
सोमवार, दि. १५ एप्रिल २०२४
रात्रौ ८.३०
- स्थळ -
**अशोक दत्तात्रय शहापुरे**
राममंदिर, चिन्मय हौ.सौ., पंचवटीनगर, पाईपलाईन रोड

**श्री लक्ष्मीनारायण सत्संग मंडल**
सोमवार, दि. १५ एप्रिल २०२४
रात्रौ ८.३०
- स्थळ -
**श्री कपिलेश्वर मित्र मंडळ**
माळीवाडा वेस, अहमदनगर

**श्री दक्षिण मुखी हनुमान सत्संग मंडळ**
सोमवार, दि. १५ एप्रिल २०२४
रात्रौ ८.३०
- स्थळ -
**छत्रपती शिवराय तरुण मंडळ**
गाडगीळ पटांगण, नालेगाव, अहमदनगर
**दत्तात्रय मुदगल**

**श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ (ट्रस्ट)**
सोमवार, दि. १५ एप्रिल २०२४
रात्रौ ८.३०
- स्थळ -
**जय श्री महाकाल ग्रुप**
युनियन बँकच्या जवळ, पापय्या गल्ली, चितळेरोड, अ.नगर


**समाचार**
**वाचकांना नम्र सूचना**
**समाचार** वृत्तपत्रातून प्रसिध्द होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करुनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची **समाचार** वृत्तपत्र कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्यांच्या परिणामाबद्दल **समाचार** वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाहीत. याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.


## मुंबई शेअर भाव

**युध्दजन्य परिस्थिती सेन्सेक्स ६०० ने कोसळला**

(शेअर सबब्रोकर)
अशोक पटवा
फोन-२४५२५२७, २४५२२६४
मोबा. ८७८८६९९९६१
**दिनांक १५-४-२०२४**
**दुपारी २ पर्यंतचे भाव**

| | |
|---|---|
| आजचा इंडेक्स : | ७३६४० |
| एसीसी | २४५०-५१ |
| एशियन पेंट | २८३८-३९ |
| बजाज ऑटो लि. | ९००५-०६ |
| बलराम फूड चिनी | ३७४-७५ |
| भारत फोर्ज | ११६६-६७ |
| क्रॉम्प्टन | २९३-९४ |
| डीएलएफ | ८९२-९३ |
| डॉ. रेड्डीज् लॅब | ६००१-०२ |
| ग्रॅफाईट इंडिया | ६५८-५९ |
| हिंदुस्थान युनिलिव्हर | २१९४-९५ |
| आयटीसी लि. | ४२६-२७ |
| एल ॲण्ड टी लि. | ३६१२-१३ |
| रिलायन्स इंड. | २९५०-५१ |
| एसबीआय | ७६२-६३ |
| टाटा मोटर्स | १००५-०६ |
| टाटा स्टील | १६१-६२ |
| टीसीएस | ३९५०-५१ |
| लक्ष्मी ऑरगॅनिक | २५२-५३ |
| सुवेन फार्मा | ६२६-२७ |

PDF Compressor Free Version



# नगरमध्ये महामानवाला अभिवादन

**समाचार/नगर-दि.१५**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त रविवारी सायंकाळी शहरातून भव्य मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीत भीम गितांवर थिरकणारी तरुणाई, जय भीमचा जयघोष व लेझर शोची रोषणाई अशा जल्लोषपूर्ण वातावरणात जयंती साजरी करण्यात आली.

## मराठा पतसंस्थेतर्फे डॉ. आंबेडकर, महाराणी ताराबाई यांना अभिवादन



**समाचार/नगर-दि.१५**

भारताची लोकशाही अधिक बळकट व्हावी या उद्देशाने लिहिलेले संविधान लोकशाहीसाठी त्यांनी त्याकाळी घेतलेला महत्त्वपूर्ण निर्णय, त्यांची वाचन संस्कृती, आचार, विचार हे नव्या पिढीतील तरुणांनी समोर ठेवून छत्रपतींच्या विचारांचा वारसा आणि डॉ.बाबासाहेबांच्या विचारांची शिदोरी सोबत ठेवून वाटचाल केली पाहिजे, असे प्रतिपादन अहमदनगर जिल्हा मराठा नागरी सहकारी पतसंस्थेचे उपाध्यक्ष किशोर मरकड यांनी केले.

अहमदनगर जिल्हा मराठा सेवा संघ प्रणित अहमदनगर जिल्हा मराठा नागरी पतसंस्थेच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती व महाराणी ताराबाई यांची जयंती मार्केट यार्ड शाखेत आज साजरी करण्यात आली. याप्रसंगी पतसंस्थेचे उपाध्यक्ष किशोर मरकड, मराठा सेवा संघाचे अध्यक्ष इंजि. सुरेशराव इथापे, संचालक सतिष इंगळे, प्रा.किसनराव पायमोडे, उदय अनभुले, अच्युत गाडे, मुख्य कार्य.अधिकारी अशोक वारकड, बबन सुपेकर, रणजित रक्ताटे, प्रशांत बोरुडे, तेजस कासार, कृष्णा लांडे, दिव्यांगी लांडे, अतिष रोहोकले आदि उपस्थित होते.

किशोर मरकड पुढे म्हणाले की, डॉ.बाबासाहेबांनी अतिशय प्रतिकूल परिस्थितीमध्ये उच्च शिक्षण घेऊन स्वतः ला सिद्ध केले. भारताचे नाव जगाच्या पाठीवर नेणारे छत्रपती शिवरायांनंतर नंतर डॉ.बाबासाहेब हे होते. या दोन्हीही महापुरुषांबद्दल आम्हाला नितांत आदर आहे. मराठ्यांच्या इतिहासात महाराणी ताराबाई हे एक ज्वलंत पर्व आहे. त्या काळात त्यांनी मुघल सत्तेच्या विरोधात जो लढा दिला ते पाहून मुघल सुद्धा भयभीत झाले होते. त्यांचा इतिहास जाणून घेणे अत्यंत गरजेचे आहे. महाराणी ताराबाई यांच्यामुळे मराठी राज्य टिकून राहिले, हे सत्य नाकारता येणार नाही.

यावेळी बोलतांना इंजि. सुरेशराव इथापे म्हणाले की, आज भारताचे संविधान लिहून सर्व समाजाला समान अधिकार देण्याचा प्रयत्न हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केला. त्यांनी केलेले वाचन, मांडलेले विचार, त्यावेळेस दिलेला लढा समाज परिवर्तनाची मोठी लढाई होती. त्यांनी लिहिलेले संविधान हे लोकशाहीचे सर्वात मोठे यश असल्याचे सांगितले. सूत्रसंचालन किसनराव पायमोडे यांनी केले तर आभार अच्युत गाडे यांनी मानले.

## महाविकास आघाडीतर्फे डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी

**समाचार/नगर-दि.१५**

भारतीय संविधाने शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी देशातील गरीब, वंचित, दुर्बल, उपेक्षित बांधवांना समानतेचा हक्क आणि स्वाभिमानासाठी लढण्याचे बळ दिले. शिका आणि संघटीत व्हा या त्यांच्या संदेशाने बहुजनांच्या कित्येक पिढ्यांचे कल्याण केले. त्यांचे प्रत्येक क्षेत्रातील असामान्य कार्य आपणास नेहमीच प्रेरणादायी राहील. नागरिकांना एक मताचा समान अधिकार, सर्वांना स्वाभिमानाने जगण्याची, विकासाची समान संधी संविधानाद्वारे उपलब्ध करुन देणारे डॉ.बाबासाहेब आंबेडकर युगपुरुष होते, असे प्रतिपादन जि.प.सदस्या राणीताई लंके यांनी केले.



महाविकास आघाडीच्यावतीने भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त मार्केट यार्ड चौकातील त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी शिवसेना शहरप्रमुख संभाजी कदम, राष्ट्रवादीचे शहर जिल्हाध्यक्ष अभिषेक कळमकर, माजी महापौर भगवान फुलसौंदर, सुरेखा कदम, संजय शेंडगे, अशोक गायकवाड, बाळासाहेब बोराटे, दत्ता कावरे, शाम नळकांडे, वसंत शिंदे, संजय गारुडकर, दत्ता जाधव, नलिनी गायकवाड, संग्राम कोतकर, परेश लोखंडे, योगिराज गाडे, गौरव ढोणे, सचिन शिंदे, फारुक रंगरेज, प्रशांत गायकवाड, दिपक भोसले, बबलू शिंदे आदि उपस्थित होते.

संभाजी कदम, अभिषेक कळमकर यांची यांची भाषणे झाली.

## शहर जिल्हा भाजपातर्फे अभिवादन

**समाचार/नगर-दि.१५**

केंद्रातील भाजपा प्रणित पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सरकारने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा विविध योजनांच्या माध्यमातून उचित गौरव केला आहे. तसेच इंदू मिल येथे साकारात असलेले त्यांचे भव्य स्मारक हे सर्वांसाठी प्रेरणादायी असेल, असे प्रतिपादन भाजपाचे शहर जिल्हाध्यक्ष अॅमड. अभय आगरकर यांनी केले. शहर जिल्हा भाजपाच्यावतीने भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त मार्केट यार्ड येथील त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले.



याप्रसंगी शहर जिल्हाध्यक्ष अॅड.अभय आगरकर, जिल्हा सरचिटणीस सचिन पारखी, प्रशांत मुथा, महेश नामदे, बाबासाहेब वाकळे, भैय्या गंधे, बाबासाहेब सानप, राहुल जामगांवकर, प्रिया जानवे, कुसूम शेलार, कालिंदी केसकर, लिला आगरवाल, गोपाल वर्मा, साहेबराव विधाते, सुनिल सकट, राजेंद्र एकाडे, अॅड. विवेक नाईक, बाळासाहेब गायकवाड, रविंद्र बारस्कर, चंद्रकांत पाटोळे, वैभव झोटिंग, पंडित वाघमारे आदि उपस्थित होते.

## एचपीचे एआय तंत्रज्ञानावर आधारित गेमिंग लॅपटॉप




एचपीने एआय तंत्रज्ञान असलेल्या नव्या लॅपटॉपची रेंज बाजारात आणली आहे. गेमर्स आणि कंटेट क्रिएटर्ससाठी अतिशय उपयुक्त असा हा लॅपटॉप असेल. या रेंजमध्ये ओमेन ट्रान्सेंड १४ आणि एचपी Envy x३६० १४ चा समावेश आहे. गेमिंगचा आणि कंटेट क्रिएशनचा अनुभव आणखी सुकर करण्यासाठी इंटेलचे अल्ट्रा प्रोसेसर्स आहेत. गेमिंगसाठी एआय तंत्रज्ञानाचा वापर– जे युजर्स गेमिंग करतात आणि कंटेट क्रिएशनचं काम करतात त्यांच्यासाठी हा लॅपटॉप तयार करण्यात आला आहे. ओमेन ट्रान्सेंड १४ मध्ये NVIDIA GeForce RTX४०६० ग्राफिक्स आहेत. गेमिंग आणि उत्तम ग्राफिक्स असल्यामुळे एआयला आणखी बळ मिळते. ओमेन ट्रान्सेंड १४ मध्ये असलेल्या इंटेल प्रोसेसर्समुळे गेमर्स नवीन गेम्स आणि काही क्लिष्ट कामे अगदी सहज करू शकतात. ओमेम ट्रान्सेंड १४ इंटेल आणि NVIDIA प्रोसेसर्समुळे लोकल एआय आणि बिल्ट इन एआय अशी दोन्ही वैशिष्ट्ये पहायला मिळतात. Otter.ai मुळे मीटिंग किंवा क्लासेसच्या वेळी ट्रान्सक्रिप्शन किंवा कॅप्शन्स देण्याचे काम त्याचवेळी होऊ शकते. तसे. एआय आधारभूत नोट्स काढणे, एखादा कार्यक्रम रेकॉर्ड करणे ही कामेसुद्धा सहज होऊ शकतात. हलका आणि बारीक रचना– ओमेन ट्रान्सेंड १४ हा एचपीचा सगळ्यात हलका गेमिंग लॅपटॉप आहे. त्याचे वजन १.६३७ किग्रॅ आहे आणि बॅटरी ११.५ तास चालते. टाईप सी PD140W चे अडाप्टर असल्यामुळे चार्जिंग अधिक सोपे झाले आहे. एचपी ओमेन ट्रान्सेंड १४ हा एचपीच्या सर्व स्टोअर्समध्ये आणि एचपी ऑनलाईन स्टोअर मध्ये उपलब्ध आहे त्याची किंमत १७४,९९९ पासून सुरू होते आणि तो सिरॅमिक व्हाईट आणि शॅडो ब्लॅक या रंगात उपलब्ध आहे.

## स्त्री पुरुष समानतेवर आधारित एरीअलचे नवे अभियान

गेल्या नऊ वर्षांत एरियल इंडियाने सातत्याने घरातल्या कामांच्या विषम वाटणीवर चर्चा– संवाद घडवून आणत पुरुषांना #ShareTheLoad चे आवाहन केले आहे. समाजाची प्रगती झाली, तसे पुरुषांनाही आपल्या जोडीदाराला समान पाठिंबा देणे महत्त्वाचे असल्याची जाणीव झाली. २०१५ मध्ये एरियलने हा प्रवास सुरू केल्यापासून कपडे धुण्यासारखी घरातली कामे केवळ स्त्रीची जबाबदारी मानणाऱ्या पुरुषांची संख्या ७९ टक्क्यांवरून लक्षणीय प्रमाणात कमी होऊन २५ टक्क्यांवर आली आहे. मात्र, आणखी प्रगती होणे आवश्यक असल्याचे लक्षात घेत एरियलने ही चर्चा पुढे नेण्यासाठी पुरुषांना घरातल्या कामाचा शारीरिक ताण स्वीकारण्याबरोबरच घरात एक टीम म्हणून काम करत मानसिक ताण उचलण्यासाठीही प्रोत्साहन देण्याचे ठरवले. अशा एकत्रित प्रयत्नांमुळे पुरुषांना त्यांच्या जोडीदाराचा विश्वास आणखी चांगल्या प्रकारे जिंकता येईल तसेच पत्नीला बाहेरच्या जगात जास्त आत्मविश्वासाने वावरण्यासाठी




हातभार लावता येईल. एरियलची नवी फिल्म 'HomeTeams ShareTheLoad,' मध्ये घरात टीम बनून काम करत एकत्रितपणे जबाबदारी वाटून घेण्याची संस्कृती रूजवण्यावर लक्ष केंद्रित आले आहे. आयेशा नावाच्या करियर आणि घरातल्या कामांची जबाबदारी निभावणाऱ्या स्त्रीच्या कहाणीतून पुरुषांना हा महत्त्वाचा प्रश्न विचारण्यात आला आहे. ही फिल्म कशाप्रकारे छोटे क्षण आपला दृष्टीकोण आमूलाग्र बदलतात हे दाखवणारी तसेच पुरुषांना जराशी चालना दिल्यास ते प्रामाणिकपणे कामातला समान भागीदार बनण्याचा प्रयत्न करतात हे सांगणारी आहे. या कॅम्पेनच्या लाँचसाठी दिग्गजांचे पॅनेल एकत्र आले होते व त्यात बॉलिवूड आयकॉन अनिल कपूर, अभिनेत्री सोनम कपूर, पी अँड जी भारत उपखंडाच्या प्रमुख मुक्ता माहेश्वरी आणि बीबीडीओ इंडियाचे अध्यक्ष व प्रमुख क्रिएटिव्ह अधिकारी जोसी पॉल यांचा समावेश होता. या सर्वांनी घरातील कामाची समान जबाबदारी पती–पत्नीनं घेणं खूप महत्त्वाचं असल्याचं नमूद केल.

## शब्दखेळ – १४९

सोबतच्या चौकोनात महाराष्ट्रातील १० नद्यांची नाव लपलेली आहेत. शोधा पाहू.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| स | र | स्व | ती | ने | रा | वी | वा |
| का | न | सा | गो | क | मी | वे | र |
| रे | दा | मी | स्व | ड | इ | य | णा |
| दु | ध | गं | गा | वी | उ | मु | स |
| हु | वे | र | पी | से | ट | ना | री |
| कुं | गं | वा | कृ | ब | इ | उ | व |
| भी | गे | र | डे | स | गं | वा | दा |
| नी | चे | णा | कु | मा | गा | जी | गो |

### शब्दखेळ – १४८ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| आ | अ | क्या | जॉ | नी | लि | व | र |
| गा | स | रा | ज | पा | ल | ग | प |
| ता | रा | बा | रं | डू | ज | रे | के |
| का | नी | णी | धु | र | ग | ज | श्तो |
| द | ब | द | मा | क | दी | से | मु |
| र | क | मु | ळ | ना | प | ग | ख |
| खा | जो | ह | गी | ट | त्र | च | र्जी |
| न | द | मे | भ | ग | वा | न | का |

## शेल अॅडव्हान्स मोटरसायकल ऑईलची अपग्रेडेड आवृत्ती बाजारात




शेल लुब्रिकंट्स इंडियाने शेल अॅडव्हान्स मोटरसायकल ऑईलची अपग्रेडेड मर्यादित आवृत्ती बाजारात आणली आहे. त्यामुळे ग्राहकांचा वाहने चालवण्याच्या अनुभवाला आधुनिक साज येणार आहे. कंपनीने अपग्रेडेड पोर्टफोलिओ मर्यादित स्वरुपात बाजारात आणला असून त्याचा ब्रँड अॅम्बिसिडर शाहीद कपूर असून 'रुकना मुश्किल है' या ब्रँड कॅम्पेनसाठी त्याचा सहभाग कायम ठेवला आहे. २०२३ मध्ये हे कॅम्पेन सादर करण्यात आले होते. यातून शेल अॅडव्हान्स इंजिन ऑईल बरोबरच भारतीय वाहनचालकांची आवड, जिद्द, निश्चय, आशा, दिसते. नवीन शेल अॅडव्हान्स AX७ सिथेंटिक तंत्रज्ञानामुळे ग्राहकांना गाडी चालवणे आणखी सुलभ होते. तसंच फ्लेक्सी मॉलिक्युल टेक्नॉलॉजीमुळे इंजिनातून चाकांमध्ये होत असलेले पॉवर ट्रान्स्फरचे कार्य अतिशय प्रभावीपणे होते. अपग्रेडेड शेल अॅडव्हान्स AX५ प्रिमिअम मिनरल ऑईलमध्ये अॅडव्हान्स क्लिन्सिंग टेक्नॉलॉजी आणि काही अतिरिक्त वैशिष्ट्ये आहेत त्यामुळे गाडी विनासायास सुरू होते आणि इंजिनचे आयुष्य सुधारते. उत्पादनांची ही नवी रेंज शेल अॅडव्हान्स वर्कशॉप आणि भारतातील सर्व रिटेल आऊटलेट्समध्ये उपलब्ध असेल.

## ओके प्ले इंडियाच्या एबीटामध्ये १२६ टक्क्यांची वाढ

प्लास्टिक, मोल्डेड फर्निचर, मैदानी खेळाची उपकरणे, पॉईंट ऑफ पर्चेस उत्पादने, ऑटोमोटिव्ह घटक आणि इलेक्ट्रिक वाहनांच्या निर्मितीमध्ये गुंतलेल्या आघाडीच्या ओके प्ले इंडिया लिमिटेड या कंपनीने ३१ मार्च २०२४ रोजी संपलेल्या तिमाही आणि वार्षिक आर्थिक वर्षासाठी मजबूत कमाईची घोषणा केली आहे. ३१ मार्च २०२४ रोजी संपलेल्या तिमाहीत कंपनीचा महसूल ४८३८.४६ लाखांनी वाढला असून यामध्ये ४५ टक्के वाढ झाली आहे तर कंपनीचा EBITDA १२६ टक्क्यांनी वाढला आहे. जो २५२.०५ लाखाहून तिसऱ्या तिमाहीत ५७१.८३ लाख इतका (वार्षिक) वाढला आहे. pat ने मजबूत वाढ अर्थात ४२६.३३ लाख नोंदवली. अलीकडेच कंपनीने १.१० च्या प्रमाणात कंपनीच्या इक्विटी शेअर्सचे विभाजन केले म्हणजे १ रुपये नाममात्र मूल्याच्या प्रत्येक १ इक्विटी शेअरचे विभाजन केले. प्रत्येकी १० इक्विटी समभागांमध्ये प्रत्येकी १ रुपये मूल्यामध्ये हे विभाजन होते. यापूर्वी कंपनीने जाहीर केले होते की तिने अलीकडेच अधिग्रहित केलेल्या पूर्ण मालकीच्या उपकंपनी MRH टेक्नॉलॉजीज लिमिटेड MNN+HUMMEL फिल्टर प्रायव्हेट लिमिटेड समूह जी जर्मनीची उपकंपनी आहे तिच्या सोबत करार केला आहे. त्यांच्या क्रांतिकारी नवीन उत्पादनांच्या प्रचार, वितरण, पुरवठा, इन्स्टॉल आणि सेवा करण्यासाठी त्याचे एकमेव आणि अनन्य वितरक म्हणून puarair Mobile Fine असणार आहे.

लोकार्थ

संकलन-संयोजन
सुबोध रणशेवरे
subodh.ranshevre rediffmail.com

PDF Compressor Free Version



### शहरात लोडी समाजातर्फे गणगौर विवाह सोहळा उत्साहात

# गणगौर उत्सवातून जुन्या परंपरा पुढच्या पिढीपर्यंत पोहचविण्याचे कार्य - फिरोदिया

**समाचार/नगर-दि.१५**

शहरातील लोडी साजन समाजातर्फे केशरगुलाब मंगल कार्यालयात गणगौर विवाह सोहळा पारंपरिक पद्धतीने उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. यावेळी शिव पार्वती अर्थात गण-गौर विवाह सोहळा साजरा झाला. तीन दिवस चाललेल्या या सोहळ्यामध्ये शहराच्या विविध भागामधील महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. या गण-गौर सोहळ्याचे नियोजन जैन ओसवाल पंचायत सभा, जय आनंद महावीर युवक मंडळ व सहेली ग्रुपच्यावतीने करण्यात आले होते.

आदिती सौरभ मुथा, वर्षा लाभेश ओस्तवाल, प्रगती रजत चोपडा, भावना मेहेर या दाम्पत्यांच्या हस्ते गण-गौर्चा विधीवत पूजा करण्यात आली. यावेळी सहेली ग्रुपच्या छायाताई फिरोदिया, आशाताई मुनोत, आशाताई फिरोदिया, मंगला मुथा, मिनाताई मुनोत, जयआनंद महिला मंडळाच्या अध्यक्षा संध्या मुथा, सेक्रेटरी सुरेखा बोरा आदी उपस्थित होते.



जैन ओसवाल पंचायत सभेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया, सहसेक्रेटरी संतोष गांधी, सी.ए. महेश भळगट, बाळासाहेब भंडारी, डॉ. विजय भंडारी, संपतलाल मुथियान, अ‍ॅड. विजय मुथा, अ‍ॅड.गौरव मिरीकर, अनिल मेहेर, संदीप गांधी, मंडळाचे सेक्रेटरी आनंद मुथा व पदाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या कार्यक्रमात प्रारंभी गण-गौरची भव्य वरात काढण्यात आली. बँड पथक, पारंपारिक वेषभूशा केलेल्या व डोक्यावर शिव पार्वतीची मूर्ती घेतलेल्या महिला यात सहभागी झाल्या होत्या. केशर गुलाब मंगल कार्यालय येथे विवाह संपन्न झाला. तीन दिवस चाललेल्या या सोहळ्यात पहिल्या दिवशी फळतीज पूजा, दुसर्या दिवशी झालावरणा व तिसर्यात दिवशी विवाह असे धार्मिक कार्यक्रम होतात. झालावरणा कार्यक्रमात महिलांनी पारंपरिक राजस्थानी लोकनृत्य सादर केले. शितल गांधी यांनी अतिशय सुंदर राजस्थानी गीत सादर करतानाच कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

यावेळी बोलताना आशाताई फिरोदिया म्हणाल्या की, राजस्थानी संस्कृतीत गणगौर उत्सवाला मोठी परंपरा आहे. नगरमध्येही गणगौर सारखा पारंपरिक सण दरवर्षी मोठ्या उत्साहात साजरा करून महिला पुढच्या पिढीपर्यंत ही परंपरा पोहचवत आहेत. यानिमित्त सर्वजणी एकत्र येवून एकमेकींशी संवाद साधून सणाचा आनंद घेतात. यावर्षीही चांगला उत्साह पहायला मिळाला.

नरेंद्र फिरोदिया म्हणाले की, जैन ओसवाल पंचायत व जय आनंद महिला मंडळाने सण उत्सव एकत्रित साजरे करून महिलांना एकत्र आणण्याची परंपरा सुरू केली आहे. अशा उपक्रमांतूनच पूर्वापार चालत असलेल्या परंपरांचे जतन होत असल्याचे त्यांनी सांगितले. शांतीकुमारजी फिरोदिया मेमोरियल फौंडेशनतर्फे स्नेहभोजनाची व्यवस्था करण्यात आली होती. सौ.पुष्पा ललित बनभेरु यांनी सर्व पूजेची व्यवस्था पाहिली. चकोर मुळे गुरुजी यांनी पूजाविधी केला. जैन ओसवाल पंचायत सभा, जय आनंद महावीर युवक महिला मंडळ व सहेली ग्रुपच्या सर्व सदस्यांनी कार्यक्रमासाठी परिश्रम घेतले.शेवटी जैन ओसवाल पंचायत सभेचे सहसेक्रेटरी संतोष गांधी यांनी आभार मानले.

# करोना काळात खा. विखे यांनी सामाजिक बांधिलकी जपली- डॉ. गर्जे

**समाचार/नगर-दि.१५**

करोना संकटात काळात समाजाच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याची भूमिका खा.सुजय विखे यांनी घेतली. त्यांनी कोणतीही स्टंटबाजी केली नाही. त्यामुळे सामाजिक बांधिलकीला जनता भक्कमपणे साथ देईल, असे प्रतिपादन भाजपाचे तालुकाध्यक्ष डॉ. मृत्युंजय गर्जे यांनी केले.



गर्जे पुढे म्हणाले की, त्यांनी पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील रुग्णालयात स्वतंत्र करोना सेंटर सुरू करून नगर जिल्ह्यातील करोना रुग्णांना उपचारांची सोय उपलब्ध करून दिली.रूग्णांना ऑक्सीजनची टंचाई होती, अशावेळी स्वतंत्र ऑक्सिजन प्रकल्प सुरू केला.रेमडिसीव्हर इंजेक्शनची उपलब्धता प्रत्येक रुग्णाला करून दिली. त्यामध्ये त्यांच्यावर आरोप करून बदनाम करण्यचा प्रयत्न झाला. पण थोडेही विचलित न होता त्यांनी करोना करोना योध्दा म्हणून काम केले.

खा . विखे यांची उमेदवारी नगर जिल्ह्याच्या दृष्टीने महत्त्वाची आहे. मागील पाच वर्षात झालेल्या विकास कामामुळे भाजपाने त्यांना पुन्हा उमेदवारी दिली आहे. त्यामुळे मतदारसंघातील जनता खा.विखे यांना समर्थन देईल. करोना काळात इतर सर्व रुग्णालय बंद असताना विखे पाटील रूग्णालयात सुमारे सातशेहून अधिक महिलांच्या प्रसूती मोफत करून सामाजिक सामाजिक बांधिलकी जोपासली.सिंधू अन्नछत्र मोफत किरणा किटचे गरजूंना वाटप केले. जिल्ह्यातील २७० शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. या कुटुंबांना दतक घेवून त्यांच्या परिवारात रोजगार आणि शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. खा.विखे यांनी घेतलेली भूमिका अभिमानास्पद राहिल्याचे डॉ. गर्जे यांनी सांगितले. करोनाकाळात केंद्र सरकारने खासदारांना मिळणारा सर्व निधी करोना फंडासाठी वापरला.निधी नाही म्हणून कोणतेही कारण न सांगता खा.विखे हे अविरतपणे करोना संकट काळात मतदार संघातील जनतेच्या पाठिशी करोना योध्दा म्हणून उभे राहिले. त्यावेळी राज्यात महाविकास आघाडीचे सरकार होते. परंतु, करोना संकटात उपाय योजना होवू शकल्या नव्हत्या. खा.विखे यांनी उपलब्ध असलेल्या सुविधांचा उपयोग करून करोना संकटावर मात करण्यासाठी केलेले प्रयत्न लक्षवेधी होते, असेही डॉ. गर्जे म्हणाले.

# महामानवाकडून कार्याची प्रेरणा - आ. जगताप

**समाचार/नगर-दि.१५**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजातील अस्पृश्यता नष्ट करत सामाजिक समता प्रस्थापित करण्याचा विचार दिला, त्यांनी संविधान दिलं. त्यांच्या स्मृती आयुष्यभर समाधान आणि देशासाठी काम करण्याची प्रेरणा देते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी शिका, संघटित व्हा, संघर्ष करा हा मंत्र दिला. त्यानुसार आजची तरुणाई शिक्षणासह सर्वच क्षेत्रात आपलं वेगळा ठसा उमटवित असल्याचे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले.

छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे संग्राम भैय्या जगताप फाउंडेशनच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आ. जगताप यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी जिल्हा कामगार संघटनेचे अध्यक्ष संतोष लांडे, संतोष भिंगारदिवे, सुरेश बनसोडे, बाली बांगरे, सुनील उबाळे, करण भिंगारदिवे, शब्बीर शेख, आशिष तांडला, सोमनाथ वाकचौरे, गौरव वामन, निरंजन नामदे, अंकुश मोहिते आदींसह पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.




### आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्यांची पोलिस प्रमुखांकडे मागणी

# भीम उत्सव प्रसंगी राडा करणारांवर मोक्कांतर्गत कारवाई करा



**समाचार/नगर-दि.१५**

नील क्रांती चौक येथे भीम उत्सवाच्या कार्यक्रमांमध्ये धुडगूस घालून तोडफोड करणाऱ्या व्यक्तीवर मोक्कांतर्गत कारवाई करण्याची मागणी. समस्त आंबेडकरी जनतेच्या वतीने पोलीस अधीक्षकांकडे करण्यात आली. क्रांतीसुर्य ज्योतिबा फुले व विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा जयंती सप्ताह साजरा करण्यात आला. नील क्रांती चौक येथे कार्यक्रम चालू असताना विजय पठारे याने कार्यक्रमाच्या ठिकाणी येऊन शिवीगाळ करत खुर्च्या फेकून मारहाण केली त्याला नीलक्रांती चौक मित्र मंडळाच्या कार्यकर्त्यांनी थांबवण्याचा प्रयत्न केला, मात्र विजय पठारे हा अट्टल गुन्हेगार असून मोक्याच्या गुन्ह्यातून जामिनावर बाहेर आला असून ही व्यक्ती गुंड प्रवृत्तीची असून त्याच्यावर पुन्हा मोक्या अंतर्गत कायदेशीर कारवाई करण्यात यावी व नील क्रांती चौक मित्र मंडळाच्या निर्दोष कार्यकर्त्यांवर दाखल गुन्हे मागे घेऊन त्यांना सोडण्यात यावे अशी मागणी पोलीस अधीक्षक राकेश ओला व पोलिस उपअधीक्षक अमोल भारती यांच्याकडे करण्यात आली यावेळी आंबेडकरी चळवळीचे अशोक गायकवाड, सुरेश बनसोडे, सुनील शेत्रे, बंडू आव्हाड, सुमेध गायकवाड, किरण दाभाडे, सुशांत महस्के, प्रतीक बारसे, संजय जगताप, विशाल गायकवाड, योगेश साठे, जयाताई गायकवाड, गणेश गायकवाड, प्रमोद पडागळे, महेश भोसले, पवन भिंगारदिवे, जय कदम, वैभव कांबळे, संदीप वाकचौरे, विशाल भिंगारदिवे आदींसह महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### जिल्ह्यातील सिंधी बांधवांची लक्षणीय उपस्थिती

# चेटीचंड महोत्सव विविध उपक्रमांनी साजरा

**समाचार/नगर-दि.१५**

सिंधी समाजाचे ईष्टदेव झुलेलाल देवजींच्या जयंती, सिंधीभाषा दिवस तसेच सिंधी नववर्षाच्या निमित्ताने येथील पू.सिंधी जनरल पंचायतच्या वतीने आयोजित चेटीचंड महोत्सव - २०२४ नुकताच उत्साहात पार पडला. यात नगर शहर व परिसरातील तसेच जिल्ह्यातील हजारो सिंधी बांधव सहकुटूंब सहभागी झाले होते. त्यामुळे परिसर गजबजून गेला होता.

प्रारंभी उभारलेल्या आकर्षक मंडपात झुलेलाल देवजींच्या बहराणो साहिबची पूजा, आरती व पल्लवचा कार्यक्रम मान्यवरांच्या हस्ते व भाविकांच्या उपस्थितीत पार पडला. विविध खाद्य-पेय स्टॉल्सचे उद्घाटन डॉ.भगवान कालानी व सिंधी जनरल पंचायतचे अध्यक्ष महेश मध्यान यांच्या हस्ते एकमेकांच्या गाठी-भेटी घेत, सिंधी नववर्षाच्या एकमेकांना शुभेच्छा देत, गप्पांच्या मैफलीत सगळे तल्लीन झाले होते. बहुरुपी वीर हनुमान मुलांसाठी विशेष आकर्षण होते. याप्रसंगी उपस्थितांसाठी तंबोला गेम चे आयोजन केले गेले, त्यातील विजेत्यांना बक्षीसे देण्यात आली.



कार्यक्रमस्थळी सिंधी चॅनल (२४*७) दूरदर्शनवर सुरु होण्यासाठी सह्यांची मोहिम राबविण्यात आली. त्यास मोठा प्रतिसाद मिळाला देशभरातील सिंधी बांधवांच्यावतीने असाच उपक्रम राबवत मा.प्रधानमंत्री व सूचना प्रसारण मंत्र्यांना समस्त सिंधी समाजाच्यावतीने डीडी सिंधी चॅनल सुरु करण्याची मागणी करण्यात येणार आहे. शेवटी मेळाव्यात उपस्थितांसाठी सोडत काढण्यात आली. यातील २३ विजेत्यांना बक्षीसे देण्यात आली.प्रारंभी सकाळी तारकपुर येथील झुलेलाल मंदिर येथे पुज्य बहिराणो साहबची पूजा, आरती, पल्लव चा कार्यक्रम मान्यवरांच्या उपस्थित संपन्न झाला. त्यानंतर भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. यावेळी परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# समर्थ शाळेत महामानवाला अभिवादन

**समाचार/नगर-दि.१५**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त सावेडीतील श्री समर्थ विदया मंदिर प्रशालेत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले. माध्यमिक व उच्च माध्यमिकच्या मुख्याध्यापिका तथा प्राचार्या संगीता जोशी, प्राथमिकचे मुख्याध्यापक दुर्योधन कासार, पर्यवेक्षिका पर्यवेक्षिका वसुधा जोशी , ज्योती आनेचा, मंजिरी गटणे आदी मान्यवर उपस्थित होते. दुर्योधन कासार यांचे भाषण झाले.

मान्यवरांच्या हस्ते भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. ज्योती आनेचा, मंजिरी गटणे यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विषयी माहीती सांगितली. अमोल बागूल यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नगर वास्तव्याची माहीती दिली. भोराजी पथवे यांनी गीत सादर केले. अस्मिता कुलकर्णी आभार यांनी मानले.

### भणगे प्रमुख कार्यवाह; देशमुख, पायमोडे उपाध्यक्ष

# बालरंगभूमी परिषदेच्या अध्यक्षपदी उर्मिला लोटके

**समाचार/नगर-दि.१५**

बालरंगभूमीमुळे बालकांचा व्यक्तिमत्व विकास होत असतो. त्यामुळे या क्षेत्राचे काम अधिक वाढणे आवश्यक आहे. यासाठी येणाऱ्या काळात शहरी व ग्रामीण भागातील बालकांसाठी प्रशिक्षण शिबीर, नाट्य कार्यशाळा व विविध स्पर्धांचे आयोजन करून जास्तीत जास्त बालकांना बालरंगभूमीवर आणा, असे आवाहन मध्यवर्ती मुंबई बालरंगभूमी परिषदेचे प्रमुख कार्यवाह सतीश लोटके यांनी केले.



नगर बालरंगभूमी परिषदेच्या नूतन पदाधिकाऱ्यांच्या नियुक्तीसाठी सदस्यांची बैठक सावेडीच्या माउली सभागृहात पार पडली. निवडणूक प्रमुख म्हणून रंगकर्मी अविनाश कराळे यांनी काम पहिले. यावेळी सतीश लोटके यांनी मार्गदर्शन केले. या बैठकीत बालरंगभूमी परिषदेच्या नगर जिल्हाध्यक्षपदी उर्मिला लोटके यांची फेर निवड झाली आहे. तसेच परिषदेच्या प्रमुख कार्यवाहपदी प्रसाद भणगे, उपाध्यक्ष (उपक्रम) शैलेश देशमुख, उपाध्यक्ष (प्रशासन) सुजाता पायमोडे व कार्याध्यक्षपदी देवीप्रसाद सोहनी यांची एकमताने निवड करण्यात आली आहे. याचबरोबर परिषदेचे संघटक श्रेया देशमुख, कोषाध्यक्ष टीना इंगळे, सहकार्यवाह सोनाली दरेकर व तेजा पाठक, प्रवक्ता तेजस अतीतकर, कार्यकारणी सदस्य सपना साळुंके, सागर अलचट्टी, विराज अरगटला, प्रशांत सूर्यवंशी, ऋतुजा पाठक व स्वीकृत सदस्य म्हणून अविनाश बोधले तसेच प्रमुख सल्लागार म्हणून सतीश लोटके व अनंत जोशी आदींच्या नियुकत्या करण्यात आल्या.

प्रास्ताविकात जिल्हाध्यक्षा उर्मिला लोटके म्हणाल्या, माझ्यावर पुन्हा पाच वर्ष अध्यक्षपदाची जबाबदारी टाकल्याबद्दल सर्व सभासदांचे मी आभारी आहे. यावेळी समृद्धी बापट, वनिता बागडे, दिपाली अडगटला, मैथिली जोशी, निलेश बागडे, राहुल रसाळ, अनिल जोशी, भाग्यश्री दातखीले, शुभांगी कुटे व इतर सदस्य उपस्थित होते.



### आचार्य महाश्रमण यांचे आवाहन

# कोणत्याही आपत्तीत धर्म आणि अध्यात्म सोडू नका

**समाचार/नगर-दि.१५**

कोणत्याही आपत्तीत धर्म आणि अध्यात्म सोडू नका. धर्मावर श्रध्दा व निष्ठा ठेवा. धर्माची आराधना केल्यास आत्मकल्याणाच्या दिशेने वाटचाल करता येते. धर्म आत्मकल्याण करणारा आहे, असे प्रतिपादन युगप्रधान आचार्य महाश्रमण यांनी केले.

येथील सकल जैन संघासह फिरोदिया परिवाराने युगप्रधान आचार्य महाश्रमण यांच्या अहिंसा यात्रेचे जोरदार स्वागत भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलच्या प्रशस्त मैदानावर केले. भिंगार हायस्कूलमधील विद्यार्थिनींच्या लेझिम पथकाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. ४० जैन तत्वाचे मुकूट परिधान करत विद्यार्थिनींनी गीतावर लेझिमचा सुरेख ताल धरला.

आचार्य महाश्रमण पुढे म्हणाले, जीवनात कमवलेले सर्व इथेच राहणार आहे फक्त धर्माचा आणि अध्यात्मिक कार्याचा प्रभाव सोबत करणार आहे. जीवनात कठीण समस्यांना तोंड देताना हा आपल्या परिक्षेचा काळ आहे, हे लक्षात घेऊन धर्म आणि अध्यात्म कधीही सोडू नका. जीवनातील मंगलप्रसंगी शुभमुहूर्त पाहिले जातात ते मंगल घडावे म्हणूनच! अहिंसा, संयम आणि तप ही त्रिवेणी ज्यात सामावली तो धर्म होय.

जैन धर्माने अहिंसेकडे सूक्ष्मतेने ध्यान दिले आहे. अलिकडच्या काळात विद्यार्थी सोशल मिडिया, मोबाईल, फेसबुक यामध्ये गुरफटत चालले आहेत. सोशल मिडिया-मोबाईलचा वापर आवश्यक तेवढा जरूर करावा. नशा केल्यासारखे त्यात गुंतून पडू नये. शाळांमधून विद्यार्थ्यांवर उत्तम संस्कार झाले पाहिजेत. संयम हा संस्कार जीवनात महत्वाचा ठरतो, असे आचार्य महाश्रमण यांनी सांगितले.

अ.ए.सो.च्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया म्हणाल्या, आचार्य आनंदऋषिजींची कर्मभूमी आणि निर्वाणभूमी असलेल्या या भूमीत आपले आगमन झाल्याने ऊर्जास्त्रोतात वाढ झाली. कडक उन्हातील आपला विहार आश्चर्यकारक आहे. आपली कार्यप्रणाली नवीन ज्ञान देणारी आहे.

प्रवचन सोहळ्यात अशोक मुथ्था, सविता बच्छाव यांनी मनोगत व्यक्त केले. संभाजीनगर येथील महिला मंडळाने म्हटलेले सामुहिक स्तुतीगीत वातावरण मंत्रमुग्ध करणारे ठरले. याप्रसंगी अशोक मुथ्था, गौरव फिरोदिया, प्रकाश गांधी, संजय बोरा, सीए अजय मुथा, अॅड. गौरव मिरीकर, हेमंत मुथा, भूषण भंडारी, आशाताई फिरोदिया, सुनंदा भालेराव उपस्थित होते.

### आनंदऋषी हॉस्पिटलमध्ये १५ एप्रिल ते ९ ऑगस्ट दरम्यान

# मोफत तपासणी व सवलतीच्या दरात शस्त्रक्रिया शिबीर

**समाचार/नगर-दि.१५**



जैन सोशल फेडरेशन संचालित आनंदऋषी हॉस्पिटल येथे दि. १५ एप्रिल ते ९ ऑगस्ट दरम्यान मोफत तपासणी व सवलतीच्या दरात जनरल शस्त्रक्रिया शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. दररोज सकाळी १० ते दुपारी २ यावेळेत होणाऱ्या या शिबिरात शस्त्रक्रिया तज्ज्ञ डॉ. आर.एन. पांडे रूग्ण तपासणी व उपचार मार्गदर्शन करणार आहेत. डॉ. पांडे यांची ओपीडी सकाळी ९ ते १०.३० आणि दुपारी २.३० ते ४.३० यावेळेत खुली असते. आनंदऋषी हॉस्पिटलमध्ये अद्ययावत शस्त्रक्रिया विभाग कार्यरत आहे. आंतरराष्ट्रीय दर्जाच्या मशीन्समुळे विविध तपासण्यात अचूकता येण्यास मदत होते. जनरल शस्त्रक्रिया शिबीरात हर्निया शस्त्रक्रिया, हायड्रोसील, अपेंडिक्स, गॅस्ट्रोस्कोपी, मूळव्याध शस्त्रक्रिया, पित्ताशयातील खडे काढणे, कोलोनोस्कोपी आदि शस्त्रक्रिया केल्या जाणार आहेत.

आनंदऋषी हॉस्पिटलमध्ये डिजिटल एक्स रे , सोनोग्राफी कलर प्रिंट व रिपोर्ट, सिटी स्कॅन तसेच एमआरआय उपलब्ध आहे. हायटेक पॅथोलॉजी लॅब व ३५ अत्याधुनिक डायलेसिस मशीनव्दारे सेवा उपलब्ध आहे. आनंदऋषी ब्लड बँकेची सेवा २४ तास उपलब्ध आहे. महावीर भवन येथे रूग्ण व रुग्णांच्या नातेवाईकांसाठी भोजन व्यवस्थेची सोय आहे. शिबिराचा रूग्णांनी लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहिती व नाव नोंदणीसाठी ०२४१-२३२०४७३/७४/७५/७६. या क्रमांकावर संपर्क साधावा.



# आयएमएसच्या विद्यार्थ्यांची विविध कंपन्यांमध्ये निवड

**समाचार/नगर-दि.१५**

हिवाळे संस्थेच्या आयएमएस या व्यवस्थापन संस्थेच्या एमबीए अभ्यासक्रम पूर्ण होण्यापूर्वीच पाच विद्यार्थ्यांना मानव संसाधन विभागात नौकरी मिळाली असून कंपन्यामध्ये हजर झाले. संस्थेचे संचालक डॉ एम बी मेहता यांच्या हस्ते या विद्यार्थ्यांचे स्वागत केले यावेळी उपसंचालक डॉ विक्रम बार्नबस, विभागप्रमुख डॉ प्रोनोती तेलोरे, प्रा. सुरेश खन्ना, प्रा. विजय शिंदे उपस्थित होते.

डॉ मेहता म्हणाले की संस्था विद्यार्थांना गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि रोजगार मिळवून देण्यासाठी कटिबद्ध आहे. संस्था आणि उद्योग क्षेत्रातील अनुभवी व्यक्ती यांच्या संयुक्त विद्यमाने एक समिती स्थापन केलेली असून ती समिती विद्यार्थ्यांमध्ये उद्योग क्षेत्राला आवश्यक असणारे गुण वाढीसाठी संस्थेला मदत करते. त्यांच्या या सहकार्यामुळे विद्यार्थी अधिकाधिक रोजगाराभिमुख होतात. त्याचाच परिणाम म्हणून संस्थेतील विद्यार्थी अभ्यासक्रम पूर्ण होण्याआधीच नौकरीवर हजर होतात.

संस्था गेली ३० वर्ष व्यवस्थापनाचे अभ्यासक्रम शिकवत आहे त्यातून हजारो विद्यार्थी शिक्षण घेऊन बाहेर पडले असून आज उद्योग क्षेत्रात उच्च पदावर काम करत आहेत. त्यांच्याशी असलेल्या संबंधाचा देखील संस्थेला फायदा होत असून विद्यार्थांना नोकरी मिळवून देण्यात हे विद्यार्थी मोलाची भूमिका बजावतात.

विद्यार्थांना एक्साईड बॅटरी, स्नाईडर इलेक्ट्रिक, नेटविंड, अमेरिकन एक्सेल, होगानस अशा नामांकित कंपन्यामध्ये काम करण्याची संधी मिळाली आहे. मिळालेल्या संधीचे मेहनत करून आम्ही सोने अशी भावना यावेळी विद्यार्थांनी व्यक्त केली.


प्रिंटींग प्रेस क्षेत्रातील पाहिजेत
कुशल बाईंडर
सफाईदर, आकर्षक व वेगाने बाईंडींग करण्याची क्षमता.
निर्व्यसनी व अनुभवी. पगारी किंवा अंगावर.
प्रतिक ऑफसेट
सन फार्मा शेजारी, क्रॅम्प्टन समोर, एम.आय.डी.सी., अ.नगर. मो. 9822622740

भिंगार येथे N.A.प्लॉटस विकणे
भिंगार येथील शुक्लेश्वर मंदिर, ब्राह्मणगल्ली, 'शिवगौरी सहवास' येथील N.A. प्लॉटस विकणे आहे.
संपर्क : 98 22 11 66 52

नवीन रो-बंगले विकणे
बोल्हेगाव येथे सर्व सुविधांयुक्त उत्तम लोकेशन व क्वॉलिटीचे सलग ३ नवीन रो-बंगले विकणे आहेत.
-किंमत-
1 RK रू.१७.५० लाख
1 BHK रू.२५.५० लाख
एजंट/ब्रोकर स्वागतार्ह
-: संपर्क :-
9273448462

शेंदूर, गुलाल, कुंकू, भंडारा, भाजकी (काळी) माती, क्रिस्ट्रल रांगोळी, कलर रांगोळी, मीठ, नुडल्स, बांधकाची रांगोळी
m डागा
शांतीलाल डागा
दाळमंडई/मार्केट यार्ड, अहमदनगर.
फोन नं. ७५८८११५१५७, ९८२२०८१४४०

SASE DCORATERS
Mandap, Light & Flower Decoraters
Add. Katvan Khandoba Road, Ahmednagar
9822331006, 9579544110



## दुरुस्त जाहीर नोटीस

तमाम लोकांस या दुरुस्त जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, दिनांक १३/०४/२०२४ रोजीच्या दैनिक समाचार मधील पान नंबर ८ वर जाहीर नोटीस देण्यात आली होती. सदरहू जाहीर नोटीस मौजे चाहुराणा बु।। येथील सर्व्हे नं.७५, प्लॉट नं.४७ ही मिळकत गंगाधर बाबाजी फलके यांच्या मालकीची होती व आहे. परंतु सदर जाहीर नोटीसीमध्ये नजरचुकीने व अनावधानाने **''मौजे केडगाव येथील''** असा उल्लेख झालेला होता. वास्तविक पाहता, सदर मिळकत ही **''मौजे चाहुराणा बु।। येथील''** आहे, असे समजण्यात यावे.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस दुरुस्ती केली असे.
तारीख : १५/०४/२०२४

**अॅड. अशोक हिरालाल पालवे**
ऑफिस - श्रीराम कॉलनी पाठीमागे, पालवे मळा, केडगाव, अहमदनगर. मो. नं. ९३७१२२२६८९



घरच्यासारखी वृद्ध/रुग्णसेवा
वृद्धत्व-कॅन्सर-अपघात, शस्त्रक्रिया, स्मृतीभ्रंश इ. रुग्णांना घरच्यासारखी निवासी सेवा - शुश्रूषा. (सशुल्क)
9011020176, 9011026483, 7499980845
स्नेहदीप केंद्र
केडगाव, अहमदनगर

टीप : मुव्ही शो च्या वेळा बदलू शकतात
दिनांक - १२ एप्रिल ते १८ एप्रिल २०२४

| | |
|---|---|
| बडे मियाँ छोटे मियाँ | 8.00 AM, 11.15 AM, 2.20 PM, 4.25 PM, 7.45 PM, 10.00 PM, 10.55 PM |
| मैदान | 8.15 AM, 11.45 AM, 1.00 PM, 3.15 PM, 8.45 PM, 10.15 PM |
| स्वातंत्र्यवीर सावरकर | 9.30 AM |
| GODZILLA X KONG | 5.30 PM |
| CREW | 7.30 PM |

for screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher * - Offer Vaild On Window Booking & Phone Booking
Ahmednagar's First & Most Luxurlous Cinematic Paradlse
AVAILABLE ON book my show
CONNPLEX
3" Floor, Kohinoor Mall, Premdan chowk, Savedi, A. Nagar.
Mo. 6353564618 / 7790094001 / 7790094002

UNITED PHARMA
Sargical & Generic Medicine
Pharmaceutical Distributors
Near Kedgaon Ves, Kedgaon
UNITED PHARMA
9049934444
7972378081
9822020649






आपले उच्च विचार हीच आमची प्रेरणा...
सहकार व सामाजिक क्षेत्रात अतुलनीय योगदान देणारे आणि दिपस्तंभासम मार्गदर्शक असणारे...
आदरणीय भाऊ
सुवालालजी गुंदेचा
जन्म दिनांक १५-४-१९३४
आपल्या ९० व्या जन्मजयंती निमित्त विनम्र अभिवादन !
प्रशांत भंडारी - सरव्यवस्थापक | समीर बोरा - व्हा. चेअरमन | संतोष गांधी - चेअरमन
संचालक - मनोज गुंदेचा । अभय पितळे । शैलेश गांधी । चेतन भंडारी
विनित बोरा । अॅड. आनंद फिरोदिया । सौ. सुवर्णा डागा । सौ. प्रिती बोगावत ।
शरद गोयल । पंडीत खरपुडे । विनय भांड ।
तज्ञ संचालक - शांतीलाल गगळे । सीए डॉ. परेश बोरा व सर्व कर्मचारी वृंद
SSGJOP
सहकारमहर्षी श्री सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल नागरी सह. पतसंस्था मर्या., अहमदनगर.
सिटी सर्व्हे नं. ३६२३, बँक रोड, अहमदनगर. फोन : ०२४१ - २३५४२९५, २३२३३०५,
शाखा - मार्केट यार्ड, अहमदनगर. फोन : ०२४१-२४५११९५, मो. ८८०९८८०९२५
E-mail : jainoswalpatsanstha@gmail.com